

शब्द रुची
ऑक्टोबर २०१५
मूल्य १० रु.
पृष्ठे ४०

# असेही सीमोल्लंघन

# गुलजारजी यांच्या 'बोस्की' सिरीज या ९ पुस्तकांचा प्रकाशन सोहळा क्षणचित्रे



अंबरीश मिश्र



अरुण शेवते



डॉ. लतिका भानुशाली






गुलजारजींच्या 'बोस्की' सिरिज ९ पुस्तकांच्या प्रकाशनसमयी दिग्दर्शक संदेश कुलकर्णी, अभिनेत्री अमृता सुभाष, सानवीची आई, अंबरीश मिश्र, गुलजारजी, सानवी माजारे, अरुण शेवते, कान–नाक–घसा तज्ज्ञ डॉ. प्रदीप उप्पल, सुदेश हिंगलासपूरकर आणि डॉ. लतिका भानुशाली



अभिनेत्री अमृता सुभाष आणि दिग्दर्शक संदेश कुलकर्णी गुलजारजी यांच्या 'बोस्की' सिरीजमधील पुस्तकांचे अभिवाचन करताना

गुलजारजी आपले मनोगत व्यक्त करताना





गुलजारजी सानवी माजारे हिच्याशी हितगुज करताना



अभिनेत्री अमृता सुभाष आणि गुलजारजींच्या हस्ते मानपत्र स्वीकारताना कान–नाक–घसा तज्ज्ञ डॉ. प्रदीप उप्पल



गुलजारजींच्या हस्ते पुष्पगुच्छ स्वीकारताना पी.के. गुहा

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**ऑक्टोबर २०१५, वर्ष तिसरे**
**अंक सहावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
अतिथी संपादक : **आल्हाद गोडबोले**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

## संपादकीय...

दसरा– ज्याची आतुरतेनं वाट पाहावी, असा आनंदाचा सण. साडेतीन मुहूर्तांपैकी एक, असा. रामायण–महाभारतात महात्म्य लाभलेला. प्रभू रामचंद्रांनी याच अश्विन शुद्ध दशमीला शमीचे पूजन करून रावणाच्या वधासाठी लंकेकडे प्रस्थान ठेवले आणि पांडवांनी शमीच्या ढोलीतून शस्त्रे बाहेर काढून अज्ञातवास संपल्याचा संकेत दिला, तो याच दिवशी. असुर–शक्तींच्या नायनाटासाठी शस्त्र हाती घेण्याची परंपरा या दिवसाला लाभली. या लढाईत विजयसंपादनाची जिद्द असल्याने 'विजयादशमी' म्हणून हा दिवस साजरा होतो. त्यानिमित्त सीमा ओलांडली जात असे, म्हणून हे सीमोल्लंघन. एकविसाव्या शतकात लढाया, सीमोल्लंघन आदींची परिमाणे बदलली, स्वरूपही बदलले; पण संकल्पना राहिली. वेगळ्या पद्धतीने अंमलातही आणली गेली. प्रत्यक्ष सोने शक्य होत नसले तरी आपट्याची पाने एकमेकांना देऊन आपण हा उत्सव साजरा करतोच. सोने लुटून आणले जात नसले तरी, परदेशात नोकरी–व्यवसायाची संधी शोधून आपण देशाबाहेर प्रस्थान ठेवत असतो. हे 'सीमोल्लंघन' सुखाचे असते. मात्र सर्वांच्याच नशिबी ते असतेच, असे नाही. सक्तीने, नाइलाजाने सीमा ओलांडून देशाबाहेर जावे लागणे खूप क्लेशदायक असते. त्या वाटेवरचे भवितव्यही अंधारी असते. गेले काही दिवस सिरिया–इराकमधून युरोपाकडे हजारो निर्वासितांच्या झुंडी लोटत आहेत. आपल्या दसऱ्याच्या आनंदात त्यांच्यावर लादल्या गेलेल्या 'सीमोल्लंघना'ची जाणीवही आपण ठेवूया.

**– संपादक**

# असेही सीमोल्लंघन

## आल्हाद गोडबोले

**आपलं घर, आपलं गाव, आपली माणसं सोडून परमुलखात जाण्यासाठी योग्य दिवस म्हणून दसऱ्याचा मुहूर्त आपण साधत असतो. त्यासाठी केले जाणारे सीमोल्लंघन आनंदाचे, सुखद असते. पण प्रत्येक सीमोल्लंघन प्रत्येकासाठी सुखाचे असू शकत नाही. किंबहुना, सीमेच्या एका बाजूला संभाव्य विजयाची खात्री असते, त्यासाठी केलेली तयारी, उत्साह, विजिगीषु वृत्तीमुळे भारलेले चैतन्याचे वातावरण असते, तर पलीकडच्या बाजूला पराभवाची आणि दुःखाची छाया, वाढीव गरजा, साधनांची कमतरता, जगण्याची धडपड, सत्तीचे स्थलांतर, त्यातून येणारी हतबलता, अगतिकता, नैराश्य, निर्वासिताचे जिणे अशा अनेक गोष्टी असू शकतात.**

'दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा' असे या सणाचे महात्म्य वर्णन केले जाते. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असेही त्याचे महत्त्व. पावसाळा संपून पिके कापणीला येण्याचा हा काळ. सुगीचा, तसाच भविष्याची तजवीज करण्यासाठी, अधिक जमीन, अधिक संपत्ती जिंकून आणण्याचा. त्यासाठी सीमा ओलांडून परमुलखावर स्वारी करण्यासाठी राज्याबाहेर पडण्याचा.




म्हैसूरचा पारंपरिक दसरा उत्सव

आपल्या देशात, आपल्या संस्कृतीत दसरा वेगवेगळ्या नावांनी, वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होतो. कुठे ओणम तर कुठे विजयादशमी. कौत्सास चौदा कोटी सुवर्णमुद्रा देण्यासाठी रघुराजाने कुबेरावर स्वारी केली, त्यामुळे भयभीत होऊन कुबेराने अश्विन शुद्ध दशमी या दिवशी शमीच्या झाडावर सुवर्णवृष्टी केली. रघुराजाने आवश्यक तेवढे सोने कौत्सास देऊन बाकीचे नागरिकांना वाटून टाकले, अशी कथा स्कंदपुराणात आहे. रामायण – महाभारतातही अश्विन शुद्ध दशमीला विशेष महत्त्व मिळालेले आहे. रावणाचा वध करण्यासाठी प्रभू रामचंद्राने या दिवशी शमीचे पूजन करून प्रस्थान ठेवले. अर्जुनाने याच दिवशी शमीचे पूजन करून शस्त्रे हाती घेतली आणि पांडवांचा अज्ञातवास संपल्याची ग्वाही फिरवली. शुंभ, निशुंभ, रक्तबीज, महिषासुर आदी राक्षसांना मारण्यासाठी दुर्गेने चंडीचा अवतार धारण केला आणि नऊ दिवस या असुरांशी युद्ध केले. दशमीला तिने महिषासुराचा वध करून अंतिम विजय मिळवला म्हणून या दिवशी विशेषतः बंगालमध्ये आनंदोत्सव साजरा केला जातो. तर रघुनाथ हे हिमाचल प्रदेशातील कुलू खोऱ्यातील रहिवाशांचे दैवत, म्हणून नृत्य, बलिदान, यात्रा आदी विधींसह तिथे दसऱ्याला उत्सव होत असतो.

अश्विन शुद्ध दशमीला आकाशात तारका दिसू लागताना, 'विजय' नावाच्या मुहूर्तावर हाती घेतलेल्या कामात यश मिळते, असे मानले जाते. म्हणून या दिवशी लढाईचे रणशिंग फुंकले जात असे. महाराष्ट्रात तर या दिवशी सीमोल्लंघन करून युद्धाच्या मोहिमेवर निघण्याची परंपराच होती. मराठी साम्राज्यातील बहुतेक मोहिमा दसऱ्याच्या मुहूर्तावर सीमोल्लंघन करूनच हाती घेण्यात आल्या होत्या. राजस्थानात राजपूत राजे या दिवशी गुरूचे दर्शन घेऊन शमीची पूजा करत, तर चंडीने किंवा चामुंडेने महिषासुराचा वध म्हैसूरजवळ केला, असे मानले जात असल्याने दसऱ्याचा उत्सव साजरा करण्याची म्हैसूर संस्थानातील परंपरा दीर्घकाळापासून चालत आली आहे. थोडक्यात नावे वेगळी असली तरी त्यात शस्त्रपूजेचे आणि सीमोल्लंघनाचे सूत्र समान आहे.

अर्थात या सीमोल्लंघनाचा संबंध 'विजया'शी, विजय संपादन करून सोने लुटून आणण्याशी आहे, म्हणून ही विजयादशमी. आता अशा 'स्वाऱ्या' इतिहासजमा झाल्या म्हणून सोन्याचे प्रतीक असलेली आपट्याची / शमीची पाने एकमेकांना देऊन आपण हा सण साजरा करतो आणि काश्मीरपासून कन्याकुमारी किंवा द्वारकेपासून मणिपूरपर्यंत पर्यटनासाठी प्रस्थान ठेवण्याचा संकल्प दसऱ्याच्या मुहूर्तावर अमलात आणण्याचा प्रयत्न करतो. म्हणजे आपलं घर, आपलं गाव, आपली माणसं सोडून परमुलखात जाण्यासाठी योग्य दिवस म्हणून दसऱ्याचा मुहूर्त आपण साधत असतो. त्यासाठी केले जाणारे सीमोल्लंघन आनंदाचे, सुखद असते.

पण प्रत्येक सीमोल्लंघन प्रत्येकासाठी सुखाचे असू शकत नाही. किंबहुना, सीमेच्या एका बाजूला संभाव्य विजयाची खात्री असते, त्यासाठी केलेली तयारी, उत्साह, विजिगीषु वृत्तीमुळे भारलेले चैतन्याचे वातावरण असते, तर पलीकडच्या बाजूला पराभवाची




निर्वासितांची मार्गक्रमणा

आणि दुःखाची छाया, वाढीव गरजा, साधनांची कमतरता, जगण्याची धडपड, सक्तीचे स्थलांतर, त्यातून येणारी हतबलता, अगतिकता, नैराश्य, निर्वासिताचे जिणे अशा अनेक गोष्टी असू शकतात. सीमोल्लंघनाच्या उत्साहात, विजयोत्सावाच्या आनंदात आपण सीमेपलीकडचा विचार करतो का? फक्त आपल्या राज्याच्या, देशाच्या सीमेपुरताच नाही, तर – 'जग हेच एक खेडे' अशा व्यापक, वैश्विक व्याख्येचे स्वप्न पाहणारे आपण – जरा पाकिस्तानपलीकडे काय चालले आहे, ते डोळे उघडून पाहतो आहोत का ? अफगाणिस्तानपासून सीरियापर्यंत अनेक देशांत उसळलेल्या यादवीने हजारो सामान्य माणसांना कसे देशोधडीला लावले आहे, नियतीने त्यांच्यावर सीमोल्लंघनाची सक्ती कशी लादली आहे, भूमध्यसमुद्र ओलांडण्याच्या धडपडीत एखादा आय्लन कुर्दी नव्हे तर शेकडो जीव कसे जलसमाधी घेत आहेत; हजारो निर्वासितांचे लोंढे तुर्कस्तानमार्गे युरोपमध्ये, मुख्यतः जर्मनीत लोटले जात असल्यामुळे जर्मनीवर अभूतपूर्व संकट कसे ओढवले आहे, याची जाणीव आपल्याला व्हावी आणि सीमोल्लंघनाची पलीकडची बाजूही दिसावी, म्हणून कुमार नवाथे यांचा लेख 'शब्द रुची'च्या या अंकात प्रसिद्ध करीत आहोत.

वास्तविक सक्तीने करावे लागलेले 'सीमोल्लंघन' आणि त्यातून वाट्याला येणारे भोग भारताला आणि भारतीयांना अपरिचित नाहीत. १९४७ मध्ये फाळणीच्या दुःखापाठोपाठ पावणेदोन कोटी माणसांना करावे लागलेले स्थलांतर, त्यातून वाहू लागलेल्या निर्वासितांच्या जखमेवर खपली धरते न धरते तोच १९७१पर्यंत पूर्व पाकिस्तानातून आलेल्या आणखी एक कोटी निर्वासितांचा भारताला उचलावा लागलेला भार, त्याआधी दलाई लामांपाठोपाठ तिबेटमधून आलेले लाखो निर्वासित अशा घटनांनी आपल्याला सीमेपलीकडच्या दुःखाची जाणीवच फक्त करून दिली, असे नाही तर त्याची झळही सोसावी लागली आणि त्यातून कसे सावरायचे असते, याचा वस्तुपाठही आपण घालून दिला आहे.

पण देशा-देशांतील सीमा पुसून टाकत २८ राष्ट्रांना एकाच सीमाविरहित आधुनिक युरोपीय समुदायात आणणाऱ्या जर्मनी-फ्रान्स आदी पुरोगामी राष्ट्रांना पुन्हा सीमेवर कुंपणे घालण्याची वेळ सिरियातील यादवीने आणली आहे. निर्वासितांचे लोंढे असेच येत राहिले तर युरोपीय समुदायाची अर्थव्यवस्था कोलमडून त्यांचा चेहरामोहरा बदलून जाण्याची शक्यता या गंभीर प्रश्नाने निर्माण केली आहे. निर्वासित होण्याचे दुःख दुसऱ्या महायुद्धामुळे तमाम युरोपीय राष्ट्रांना मागील शतकात भोगावे लागले होते. जर्मनीला तर महायुद्धातील पराभवानंतर, तसेच देशाच्या आणि बर्लिनच्या फाळणीमुळे या प्रश्नाला तोंड द्यावे लागले होते आणि पंचवीस वर्षांपूर्वी दोन्ही जर्मनी एकत्र आल्याचा आनंद बाजूला ठेवून आर्थिक विषमतेचे गाडे रुळांवर आणावे लागले होते. ते झाल्यावर जर्मनीने शिवाय शेजारच्या दीड-दोन डझन गरीब देशांनाही युरोपीय समुदायात सहभागी करून सर्व 'भावां'ना आपल्या बरोबर आणण्याचे आव्हान पेलले होते. पण ते दुय्यम ठरावे, असे संकट आता पश्चिम आशियातून येऊ लागलेल्या लाखो निर्वासितांमुळे युरोपवर, त्यातही मुख्यतः जर्मनीवर कोसळले आहे. कारण या सर्व निर्वासितांची पहिली पसंती 'जर्मनी' आहे! फ्रान्ससारखे काही पुरोगामी मित्र वाटा उचलण्यास पुढे आले असले तरी बव्हंशी निर्वासितांना केवळ अन्न-वस्त्र-निवारा पुरविण्याचीच नाही तर नागरिकत्व आणि नोकरी-आरोग्यादी सुविधा देण्याची नैतिक जबाबदारीही जर्मनीला उचलावी लागणार आहे. ग्रीसला आर्थिक संकटातून बाहेर काढताना ते या शतकातील आव्हान मानले गेले होते. पण निर्वासितांनी उभे केलेले आव्हान त्यापेक्षा खूप मोठे आहे. जर्मनीच्या चान्सेलर अन्जेला मर्केल ऑस्ट्रियाच्या भेटीला गेल्या असताना रस्त्यावर एका ट्रकमध्ये ७२ निर्वासितांचे मृतदेह सापडल्याची घटना घडली. पाठोपाठ भूमध्य समुद्र ओलांडण्याच्या प्रयत्नात बुडून मरण पावलेल्या आय्लन कुर्दीच्या मृतदेहाचे छायाचित्र इंग्लंड-अमेरिकादी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले आणि अशाच नाहक जीव गमावलेल्या आणखी दोनहजार निर्वासितांच्या कहाण्यांना वाचा फुटली.

इस्लामिक राजवट आणण्याच्या हट्टामुळे, त्यातून उद्भवलेल्या अंतर्गत यादवीमुळे अफगाणिस्तानपासून सीरियापर्यंत अनेक देशांतून लाखोजणांना सक्तीने कराव्या लागत असलेल्या 'सीमोल्लंघना'ची ही कहाणी खूप मोठी आहे. ती 'सुफळ संपूर्ण' होणारी नाही आणि अवघ्या पाच उत्तरांनी संपणारी नाही.

उद्या सोने लुटताना ही कहाणी आपण लक्षात ठेवावी, सोने दुसऱ्याला देताना सांगावी आणि सोन्याचे अर्धे पान भूमध्यसमुद्रापलीकडे जिवंतपणे पोचलेल्या निर्वासितांच्याही हाती लागेल असे पाहावे!

**-आल्हाद गोडबोले**
भ्रमणध्वनी ९५९४५४४८८८



**सिरिया-इराकमधून निर्वासितांचे लोंढे असे बोटींमधून भरभरून तुर्कस्तानमार्गे भूमध्यसमुद्र ओलांडून युरोपात येत आहेत. या प्रवासात अपघात होऊन, बोटी उलटून मरण पावलेल्यांची संख्या तीन हजारांवर गेली आहे.**

रोहन प्रकाशन
नवं पुस्तक


# ए. पी. जे. अब्दुल कलाम

आणि

सृजन पाल सिंग लिखित

# विज्ञानाच्या उज्ज्वल वाटा

**भविष्यकालीन विज्ञानाचा वेध घेऊन विद्यार्थ्यांना केलेलं बहुमोल मार्गदर्शन**




- रोबोटिक्स
- एरोनॉटिक्स (विमानविद्या)
- पॅथॉलॉजी (रोगचिकित्साशास्त्र)
- स्पेस सायन्स (अंतराळविज्ञान)
- न्यूरोसायन्स (मेंदूविज्ञान)
- मटेरियल सायन्स
- पॅलिऑन्टोलॉजी (जीवाश्मविज्ञान)

**विज्ञानाच्या अशा भविष्यकालीन शाखांचा करिअरच्या दृष्टीने घेतलेला वेध...**

**विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलतीत**

मूळ किंमत रु.२००

**वैशिष्ट्यं**

- शास्त्रज्ञांनी लावलेले शोध, त्यासाठी घेतलेले कष्ट यांच्या गोष्टी
- त्या-त्या क्षेत्राचं भविष्य, त्याचा विकास यांची रंजक माहिती
- तज्ज्ञांच्या मुलाखती • शिक्षकांशी संवाद • बुद्धीला खाद्य देणारा अभ्यास
- असामान्य करिअरसाठी आधुनिक विज्ञान-क्षेत्रं कोणती याची सखोल माहिती

रोहन प्रकाशन

५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ४११०३०
✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२

अधिक माहितीसाठी
आमच्या वेबसाईटला भेट द्या
www.rohanprakashan.com

# निर्वासित - अगतिकतेचा प्रवाहो

## कुमार नवाथे

शतकानुशतके मानवप्राणी नव्या वाटा धुंडाळतो आहे. तो कधीच स्थिर-स्वस्थ नव्हता, आजही नाही. गेल्या हजार वर्षांकडे नुसती नजर टाकली तरी मानवाच्या या भ्रमंतीने जग कसे बदलून गेले, जुने कसे लयास गेले आणि नित्य नाविन्याच्या ध्यासाने आरपार कसे ढवळून निघाले... याचा अचंबित करणाराच आलेख दिसतो. कुणी धाडसी पराक्रमी देशांमागून देश काबीज करीत राहिले. आपले बस्तान, आपली भाषा, आचारविचार लादत गेले. आम्ही त्याला संस्कृती म्हणून स्वीकारत गेलो. फ्रेंचांचा, ब्रिटिश-डच-अमेरिकनांचा वारू जगभर आपापली संस्कृती रुजवत गेला. हजारो मैलांचं स्थलांतर त्यांनी केलं. प्रथम योद्धे राज्यकर्ते म्हणून.... त्यांनी देशांना संपन्न केलं आणि मग त्या आधुनिकतेला कवटाळायला हजारोंचे मार्ग त्या त्या दिशेने ओसंडून वाहू लागले.

हा इतिहास-ही भ्रमंती-ही स्थलांतरं जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून कुरबुरीने का होईना पण स्वीकारली जाऊ लागली.




**बोटीतून समुद्र ओलांडताना वडिलांचा हात सुटला आणि आयलन कुर्दीचा मृतदेहच असा किनाऱ्याला लागला.**

भारतातूनच पश्चिमी देशांत विशेषत: इंग्लंड–जर्मनी–फ्रान्स–अमेरिकेत तर अगदी जवळच्या आखाती देशांत, सिंगापूरमध्ये लाखो लोक चांगल्या राहणीमानाकरिता आपला देश सोडून गेले... ते तिकडचेच झाले. बहुतेक सन्मानाने गेले. अनधिकृतांनीही आपले प्रयत्न या ना त्या मार्गे अवलंबून कुठे कुठे आसरा मिळविला.

असे योग्य कागदपत्रांशिवाय परदेशात जाणारे घुसखोर–अनधिकृत स्थलांतरित यांचा इतिहासही जुना आहे. प्रचंड लोकसंख्या, कल्पनेबाहेरचे दारिद्र्य, विषमतेचे चटके यांनी स्वगृहापासून परागंदा व्हाव्या लागणाऱ्यांना किमान जगण्याच्या मिणमिणत्या आशा जिवंत ठेवण्याकरिता मग स्वीकारावे लागते ते 'निर्वासित' जिणे.

युद्ध किंवा युद्धजन्य परिस्थिती, हुकुमशहाची वा तत्सम स्वराजकीयांची निर्दयी राजवट यामुळे गेल्या शतका–दोन शतकामध्ये हजारोंनी स्थलांतराचा खडतर मार्ग स्वीकारला. अफगाणिस्तान, कंबोडिया, एथिओपिया, मोझांबिक, नांबिया, युगांडा, निकारागुआ आणि अजून अनेक स्वदेशातून सधनांनी–निर्धनांनी पलायन केले. हातचे सारे मागे टाकून केवळ जिवाच्या भीतीने.

पण गेल्या दोन वर्षांपासून यामध्ये जगाच्या डोळ्यावर येईल अशी भर पडली आहे ती पश्चिम आशियातल देशांमधून युरोपात जाणाऱ्या हजारो निर्वासितांची. सुदान, सिरीया, इराक, लिबियामध्ये मनुष्यसंहाराचा उद्रेक दिवसेंदिवस उग्र होत आहे. 'इसिस' संघटनेने आपल्या जन्मापासूनच क्रूरतेच्या परिसीमेपार जाऊन विरोधकांनाच नाही तर जगास वेठीस धरले आहे. लोखंडी पिंजऱ्यात बंदिस्त करून माणसांना जिवंत जाळणे, धारदार अस्त्रांनी वार करून डोके धडापासून वेगळे करणे, लोखंडी कांबीला टांगून विस्तवाच्या जाळीवर माणसांना जाळून मारणे आणि वर या साऱ्याचे चित्रण करून जगभराला दाखवून आपल्या दहशतीचा डंका सतत धारदार करत आपल्या इप्सित उद्देशाची व्याप्ती वाढवत नेणे...

हे सारे नुसते पाहाणेच एवढे अंग आणि मन गोठवून टाकणारे आहे की तेथील स्थानिकांना या आगीतून बाहेर पडण्याशिवाय दुसरा पर्यायच राहिलेला नाही. सुखासमाधानाने मांडलेला संसार, जमविलेला पैसाअडका, स्थावर मालमत्ता, नातेवाईक, मित्रगण साऱ्यांना त्यागून ही माणसे घर सोडतात, शहरगाव सोडतात, देश सोडतात, आगीतून फुफाट्यात जातात, प्रतिष्ठितांचे 'निर्वासित' होतात.

एकदा 'निर्वासित' उपाधी जोडली गेली की आयुष्यभर जपलेला स्वाभिमान, स्वत:चे जपलेले व जोपासलेले सुसंस्कृत मोठेपण जगाच्या नजरेतून क्षणात पुसले जाते आणि त्या व्यक्ती फक्त अपराधी, अवैध, घुसखोर पीडदायी व्यक्तिसमूह म्हणून तुच्छतेने वागविल्या जाऊ लागतात.



**एकविसाव्या शतकात नवा सीमाविरहित युरोप तयार होत असताना केवळ निर्वासितांना थोपविण्यासाठी कुंपणे घालावी लागली, पण त्यांच्या रेट्यापुढे मात्र ती निरर्थक ठरली.**

श्रीलंकन, तामिळी, व्हिएतनामी, कंबोडियन यांना ज्या अपमानास्पद संकटांचा सामना परदेशात प्रवेशताना भोगावा लागला त्याचीच पुनरावृत्ती आता युरोपियन सीमेवर दररोज घडत आहे. आपला देश नाईलाजाने, दुर्दैवाने साऱ्या आयुष्याच्या पुंजीसह सोडणारे काय आनंदित होऊन परजागेत-देशात जातात? आपल्या लहाग्या मुलाबाळांसह-म्हाताऱ्यांना बरोबर घेऊन किंवा त्यांच्याच नशिबावर त्यांना मागे सोडून... एक प्रश्नांकित जागेत?...

आज कोणताही देश स्वखुशीने या दुर्भागी लोकांना सामावून घेण्यास तयार नसला तरी निर्वासितांच्या वाढणाऱ्या झुंडी आणि जागतिक नवविचारवादींचा रेटा यामुळे काही प्रमाणात तरी सुदैवी (?) निर्वासित मरणभयापासून बचावून निर्वासित छावणीत पोहोचत आहेत.

स्थलांतरित हा अनेक अंगांनी पाहिला जाणारा गहन विषय आहे. मामुली इलाजांनी त्याची तीव्रता जरी कमी झाल्यासारखी दिसली तरी त्याची व्याप्ती सहृदय, समंजसतेनेच आटोक्यात येणार आहे.

निर्वासित होणाऱ्यांच्या जशा जीवघेण्या, भयानक समस्या आहेत, त्याचीच कदाचित पुनरावृत्ती त्यांना सामावून घेणाऱ्या देशातही होण्याची तीव्र शक्यता नाकारता येत नाही. बांगलादेशींमुळे आसाममध्ये वा साऱ्या ईशान्य भारतातच निर्मित झालेले प्रश्न हे घरचेच उदाहरण आहे. तरीही शेवटी निर्वासितांबद्दल जागतिक संघटनांनी मांडलेली आणि मान्य केलेली तत्त्वे किंवा पाळावयाचे नियम याचीच सधन, सुसंस्कृत आणि सुधारलेल्या देशांकडून सर्रास पायमल्ली होते आहे. युरोपियन देशांच्या सीमेवरून तैनात केलेला फौजफाटा आणि त्याचा निर्वासित शत्रूपक्षावरील बचाव हल्ला गेले अनेक महिने आपण सर्व माध्यमातून विषण्णपणे पाहतो आहोत. भरभरून माणसे वाहून नेणाऱ्या बोटी आणि त्यांचे तेवढेच महाभयंकर अपघात, शेकडोंना जलसमाधी, वाहत येऊन समुद्रकिनारी पडणारी प्रेते या साऱ्याचा आँखो देखा जेव्हा दूरचित्रवाणीवरून पाहिला जातो तेव्हा पुन:पुन्हा प्रकर्षाने जाणवते ती वर्षांपूर्वीपासून माणसांनीच निर्वासितांबद्दल केलेली नियमावली.

सुसंस्कृत समाजाच्या अस्तित्वाचा मूलाधार आहे की तो अनोळखी त्रयस्थास कसा वागवतो. स्थलांतरित जर बळजबरीने बाहेर फेकले गेले असतील वा नरसंहाराला बळी पडण्याच्या भीतीने देश सोडून निर्वासित बनले असतील तर त्यांना कायद्याचं कवच देणं ही परदेशस्थ सुसंस्कृत सरकारांची आद्य जबाबदारी आहे. माणूस म्हणून त्यांना प्रथम समानतेची वागणूक देऊन त्यास त्यांना अनोळखी असलेल्या भूभागात वसविणं हे या कलमातील प्रथम कर्तव्य आहे. मुळात प्रत्येकास मुक्त स्वातंत्र्याचा, स्वदेशाचा, घरकुलाचा अधिकार आहे. त्यात लष्करी तंट्यांमुळे त्याला बाधा येणे गैर आहे, पण जरी ती आली तर परदेशात कोणत्याही त्रासाशिवाय आसरा मागणं हाही प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे. तो प्राप्त करून देताना निर्वासितांचा देश, धर्म, जात, रंग, लिंग या गोष्टी कटाक्षाने दूर ठेवून माणुसकीच्या नात्यानेच त्यांच्याकडे



पाहिले जावयास पाहिजे. आणि ते अधिकार देतानाच त्या निर्वासितांच्या देशाप्रती असौहार्द्रतेची भावनाही दूर ठेवावयास पाहिजे. येणारे शरणार्थी हे भयगंडाने त्रस्त होऊन आले आहेत, त्यामुळे त्यांना पुन्हा काही वर्षांनी परत पाठवून देण्याचा विचारही स्वीकार करणाऱ्या देशांनी चुकूनही करता कामा नये. येणारा अभागी हा नव्या देशाचा नवीन नागरिक होत असतानाच त्याला मुक्त प्रवासाची, शिक्षणाची, नोकरी-कामधंद्याची आणि कुटुंबवत्सल राहण्याची मुभाही विनासायास मिळावयास पाहिजे आणि शेवटी, लहान मुलांना कोणत्याही परिस्थितीत प्रथम संरक्षण आणि मदत ही मिळावयासच पाहिजे. त्यांना आघातांपासून वाचविलेच पाहिजे.

परंतु दुर्दैवाने निर्वासितांना मानसिक आधार देण्याकरिता बनविली गेलेली ही तत्त्वे आज युरोपियन देशांकडून नुसतीच पायदळी तुडविली जात नाहीत तर त्याच निर्वासितांना पकडून कैद करून तुरुंगात डांबले जात आहेत. जे नियमावलीप्रमाणे गैर, निषिद्ध आहे.

रोगराई, निसर्गनिर्मित आपत्ती यावर जेवढे जालीम उपाय शोधले जात आहेत, तेवढेच किंबहुना थोडी जास्तीच सहानुभूतीमय, सुहृदयता, स्थलांतरितांप्रती आणि त्यामुळे निर्वासित बनणाऱ्यांप्रती दाखविण्याची आज नितांत गरज आहे. त्याची दखल सुसंस्कृत म्हणविणाऱ्यांनी घेतली तरच ती या वेदनेवरील हळुवार फुंकर ठरेल.

**– कुमार नवाथे**
साईप्रसाद, ६ वा मजला,
दयाळदास रोड, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई-४०० ०५७
भ्रमणध्वनी : ९८६९०१४४८६/९९७०२१७२६१
kumar.nawathe@gmail.com

# आमची आगळी-वेगळी, संग्राह्य पुस्तके !




## नूरजहान

**लेखक : ऐजाझ गुल**

**अनुवाद : सविता दामले**

आपली गायकी व मादक रुपसौंदर्य या जोरावर भारत-पाकिस्तानातल्या करोडो सिनेरसिकांच्या हृदय सिंहासनावर आरूढ झालेल्या मदमस्त नूरजहानचं खिळवून ठेवेल असं चरित्र

**(पृष्ठे - १६०)**
**(₹-१७५)**

## सोशल डायरी

**- सई तांबे**

जग उंबरठ्यापलीकडचं...आपण पाहून न पाहिल्यासारखं केलेलं. प्रश्न तेच...त्यांचे आणि आपलेही. पण उत्तरं मात्र वेगवेगळी... याच वेगळेपणाचा वेध घेत वाचकाला नकळत उंबरठ्यापलीकडे घेऊन जाणारी ही सोशल डायरी.



**(पृष्ठे - १२८)**
**(₹-१२५)**




## तीर्थाटन

**लेखिका : उमा हर्डीकर**

धार्मिक पर्यटन हा सध्या खूप लोकप्रिय होत चाललेला प्रकार. भारतात तर अनेक धर्म आणि त्यांची असंख्य प्रार्थनास्थळं यांची समृद्धी पाहायला मिळते. त्याचाच हा सखोल वेध.


**(पृष्ठे - २८८)**
**(₹-३००)**

## लोकशाहीची ऐशी तैशी

**लेखक : विभूती नारायण राय**

**अनुवाद : चंद्रकांत भोंजाळ.**

भ्रष्ट राजकारणी आणि गुंड यांच्या अभद्र युतीमुळे राजकारणाचे होत असलेले गुन्हेगारीकरण आणि त्यामुळे दुर्मीळ होत चाललेले सचोटीचे राजकारण आणि प्रशासन, याचे भेदक वास्तव मांडणारी ही कादंबरी!




**(पृष्ठे - १५२)**
**(₹-१६०)**

## आगामी प्रकाशने



### देवदास ते भुवनशोम

**लेखक : विजय पाडळकर**

विसाव्या शतकातील हिंदी चित्रपटांचा इतिहास - खंड पहिला.

**(१२ ऑक्टोबरला मुंबईत शानदार प्रकाशन)**




### ५१ गाजलेली भाषणे

**संकलन : अशोक बेंडखळे**

महाराष्ट्रातल्या ५१ गाजलेल्या वक्त्यांच्या भाषणांचे संग्राह्य संकलन

**(पृष्ठे - २९७)**



### सुवासिनी

**लेखिका : सीमा देव**

प्रख्यात अभिनेत्री सीमा देव यांच्या आत्मचरित्राची सुधारित आवृत्ती.

**(१२ ऑक्टोबरला मुंबईत शानदार प्रकाशन)**

---

मैत्रेय प्रकाशन

आमची वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती, वाचनसंस्कृतीला देते दर्जेदार मिती

पारधी हाऊस, ३ रा मजला, एम.जी. रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई- ४०० ०५७.

फोन- (०२२) २६१०१०१६, २६१५०३५८.

चेतन मोहकर (अमरावती) - ८३९०३३८६०८

टोल फ्री क्र.: 1800 222 613

E-mail : prakashanmkg@maitreyagroup.com

Website : www.maitreyaprakashan.com

**एम.ओ. करा / डी.डी. पाठवा.पुस्तकं आमच्या खर्चाने घरपोच मिळवा**

ऑन लाईन खरेदीसाठी:- www.granthdwar.com / www.majesticonthenet.com / www.infibeam.com

**मैत्रेय बुक क्लबचे सभासद व्हा आणि अक्षर खजिना मिळवा!!**

फक्त रु. ९९९/- भरा आणि लगेचच रु. १५००/- किंमतीची पुस्तके घरपोच मिळवा व नोव्हेंबर २०१५ मध्ये **'प्रिय मैत्रीण'** व **'मस्त भटकंती'** हे दिवाळी अंक मोफत मिळवा, तसेच वर्षभर **'मैत्रेय प्रकाशना'**च्या सगळ्या पुस्तकांवर घसघशीत **सूट.**



# प्रश्न निर्वासितांचा

जतीन देसाई

**पाश्चात्त्य देशांनी 'अतिरेक्यांना' मदत केली असल्यामुळे सीरियन लोक यादवी युद्धाने हैराण होऊन देश सोडत आहेत आणि यामुळे युरोपमध्ये निर्वासितांचा प्रश्न निर्माण झाला आहे. 'शत्रूचा शत्रू हा मित्र' हे धोरण अमेरिका आणि त्याच्या मित्रराष्ट्रांनी आता सोडले पाहिजे. अतिरेक्यांना मदत होईल, असे कुठलेही पाऊल कुठल्याही देशांनी उचलता कामा नये. यावर जागतिक स्तरावर एकमत व्हायला पाहिजे. असे झाले तरच दहशतवादापासून जगाला मुक्त करण्यात यश मिळेल.**

युरोपकडे धाव घेणाऱ्या निर्वासितांचे प्रश्न चिंतेत टाकणारे आहेत. सीरिया, इराक, लीबिया, नायजेरियासारख्या देशांतून हे निर्वासित येत असले, तरी त्यात सर्वाधिक सीरियन आहेत. सीरियाच्या यादवी युद्धामुळे कंटाळलेले, होरपळलेले आणि जवळच्या भविष्यात शांतता प्रस्थापित होण्याची शक्यता दिसत नसल्यामुळे लोक सुरक्षिततेसाठी त्यांचा देश सोडत आहेत. तुर्कस्तान-ग्रीसमधून हे निर्वासित पुढे वाटचाल करीत आहेत. २०११ नंतर सुरू झालेल्या या यादवीत आतापर्यंत ४० लाखांहून अधिक सीरियन नागरिक शेजारी असलेल्या तुर्की, लेबॅनॉन, जॉर्डन आणि इराकमध्ये गेले आहेत. ही आकडेवारी इतर कोणाची नसून युनायटेड नेशन्स हायकमिशनर फॉर रेफ्युजिसची आहे. सीरियातच ७६ लाख लोक विस्थापित झाले आहेत आणि अत्यंत वाईट परिस्थितीत ते आपले दिवस काढत आहेत. जगात आज सर्वात जास्त विस्थापित आणि निर्वासित सीरियातील लोक आहेत.

मुळात सीरियाचा प्रश्न काय आहे आणि यादवी युद्धाची परिस्थिती का निर्माण झाली, हे समजून घेण्याची आवश्यकता आहे. गेल्या तीन वर्षांत मला सीरियात दोनदा जाण्याची संधी मिळाली. सीरियन जनतेशी बोलता आले. मागच्या वर्षी जून महिन्यात झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकांच्या वेळेस आंतरराष्ट्रीय पर्यवेक्षक म्हणून गेलो होतो. मतदानाच्या वेळेस राजधानी दमास्कसच्या आजूबाजूला फिरत असताना राष्ट्राध्यक्ष बशीर अल असदची लोकप्रियता सर्वत्र दिसत होती. असद हे अल्पसंख्याक अलावी समाजाचे. अलावी हे शिया पंथाचे. सीरियात बहुसंख्य सुन्नी मुस्लिम. ख्रिस्ती समाजाची वस्ती पण मोठी आहे; पण गेल्या काही वर्षांत ख्रिस्ती लोकांनी मोठ्या प्रमाणात बाहेर जायला सुरुवात केली. अपेक्षेप्रमाणे राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीत परत एकदा सात वर्षांसाठी बशीर अल असद प्रचंड बहुमताने निवडून आले. अल कायदाशी संबंधित अल-नुसरा यांनी निवडणुकीत गोंधळ घालण्याचा खूप प्रयत्न केला. आम्ही फिरत असताना सर्वत्र ठिकठिकाणी बॉम्बस्फोटाचे आवाज ऐकू येत होते. मात्र, लोक बॉम्बस्फोटाला न घाबरता मतदान करत होते. निवडणुकांचा निकाल जाहीर झाल्यानंतर तर रात्रभर जल्लोष होत होता.

इस्रायलसोबत तडजोड न करण्याची सीरियाची भूमिका. पाश्चात्त्य देशांसमोर लोटांगण न घालण्याचे सीरियन धोरण. अरब स्प्रिंगचा परिणाम सीरियावर पण झाला. आंदोलने सुरू झाली;

पण त्या आंदोलनाला दहशतवाद्यांनी हायजॅक केले. हिंसेला सुरुवात झाली. अल नुसरा ही दहशतवादी संघटना सक्रिय झाली. अमेरिकेची त्याला उघडउघड मदत मिळत होती. त्यांनी अमेरिकेकडे विमानविरोधी बंदुका मागितल्या होत्या; पण अमेरिकेने त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता लक्षात घेऊन मागणी नाकारली. जगातल्या जवळपास ५० देशांतील अतिरेकी तेव्हा आणि आजही अल-नुसरामध्ये आहेत. तुर्कीमधून हे अतिरेकी सहजतेने सीरियात घुसतात. तुर्कीच्या मदतीशिवाय हे शक्य नाही. गेल्या वर्षीच्या ऑगस्टपासून इस्लामिक स्टेट ऑफ इराक ॲण्ड सीरिया(इसीस)चे नाव पुढे यायला लागले. अल नुसराच्या तुलनेत इसिस अधिक क्रूर आणि जहाल. त्यांच्यात आपसात वैमनस्य.

पाश्चात्त्य देशांना त्यांच्या पद्धतीची लोकशाही सीरियात आणायची आहे. मात्र, अमेरिकेने ज्या-ज्या देशांत हस्तक्षेप केला किंवा विरोधकांना मोठ्या प्रमाणात मदत केली, त्या ठिकाणी अतिरेकी एकतर सत्तेवर आले आहेत किंवा त्यांचा प्रभाव वाढला आहे किंवा त्या देशांत अराजक माजले असल्याचा इतिहास आहे आणि हा इतिहास अलीकडचाच आहे. २०११ पासून अमेरिका आणि त्याचे मित्रराष्ट्र असदचे दिवस पूर्ण झाले आहेत आणि लोक त्याला सत्तेवरून हाकलवून लावतील, असे म्हणत आले आहेत. सीरियाच्या प्रश्नांवर रशियाची वेगळी भूमिका आहे. रशिया असदला मदत करत आहे. रशियाने असदला शस्त्रांचा पुरवठा केला आहे. दहशतवाद्यांना संपवण्यासाठी सीरियात लष्कर पाठवण्याचा, तसेच 'मिग-३१' ही फायटर विमाने देण्याचा पण रशिया विचार करते आहे. रशियाचे गणित सरळ आहे. त्यांचे म्हणणे आहे की, जर सीरियात असदचा पराभव झाला आणि इसिसचा विजय झाला, तर हे दहशतवादी रशियाच्या दिशेने वाटचाल करतील. रशियात चेचेन्यात काही अतिरेकी संघटना गेल्या काही वर्षांपासून सक्रिय आहेत. रशिया आणि अमेरिकेत सीरियाच्या मुद्यावर मतभेद आहेत. तीन ऑगस्ट रोजी रशियाच्या परराष्ट्रमंत्री सर्जी लॅवरोव्हनी दोहा येथे पत्रकारांशी बोलताना म्हटले, पाश्चात्त्य देशांनी चार वर्षांपूर्वी सांगितले की, असदचे दिवस भरले आहेत आणि तो दिवस अजून आलेला नाही. रशियातले जवळपास दोन हजार दहशतवादी सीरियात असल्याचे म्हटले जाते. स्वाभाविकच, त्यातले जवळपास सगळे चेचेन्यातले असणार.

रशियाचे म्हणणे आहे की, इस्लामिक स्टेटचा मुकाबला करायचा असेल आणि त्यांना संपवायचे असेल, तर एक व्यापक आघाडी बनवली पाहिजे. या आघाडीत सीरिया असला पाहिजे, असा रशियाचा आग्रह आहे. दुसरीकडे आता अमेरिकेतच डेमोक्रेटिक पार्टीच्या काही सेनेट मेंबरनी असदला सत्तेवरून हाकलून लावणे ही अजूनही अमेरिकेची प्राथमिकता आहे काय, असा प्रश्न विचारायला सुरुवात केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, इसिस, अल नुसरासारख्या दहशतवादी संघटनांचा धोका मानवतेसमोर आहे आणि म्हणून अतिरेक्यांच्या विरोधात व्यापक आघाडी बनवली पाहिजे.

असदच्या विरोधात असलेल्या फ्री सीरियन आर्मीपासून इसिस, अल नुसराला परराष्ट्रातून प्रचंड प्रमाणात पैसे व शस्त्रे येतात. इराकमधील काही पेट्रोलच्या खाणींवर कब्जा असल्यानेही इसिसकडे पैशाची प्रचंड शक्ती आहे. इसिस महिलांना वस्तू म्हणून पाहते. महिलांवर अत्याचार-बलात्कार ही इसिसच्या नियंत्रणात असलेल्या परिसरात सामान्य बाब आहे. मुळात हा त्यांच्या विचाराचा भाग आहे. इसिसपासून सीरियाला मुक्त करायचे असेल, तर दहशतवाद्यांना संपवण्याशिवाय दुसरा पर्याय असदकडे नाही. अशा युद्धाच्या वातावरणात अनेकदा मानवाधिकारांचे उल्लंघन होते. पाश्चात्त्य देशांनी त्याला महत्त्व दिले आहे. सीरियन लष्कर दहशतवाद्यांच्या विरोधात चिकाटीने लढत आहे. दमास्कसच्या आर्मी हॉस्पिटलमध्ये गंभीर जखमी झालेल्या अनेक जवानांना भेटण्याचा व त्यांच्याशी गप्पा मारण्याचा योग आला. देशासाठी परत एकदा दहशतवाद्यांशी लढण्यास आपण तयार असल्याचे ते म्हणत होते.

इसिससारखी क्रूर दहशतवादी संघटना आणि लष्कर यांच्यातल्या युद्धामुळे सीरियात असुरक्षितता निर्माण झाली आहे. स्वाभाविकच, लोक स्वत: आणि आपल्या कुटुंबासाठी सुरक्षितस्थळी जाणे पसंत करणार. सीरियाच्या बऱ्याच भागात अद्याप इसिस, अल नुसराचे नियंत्रण आहे. त्या भागाला अतिरेक्यांपासून मुक्त करण्याची सरकारची जबाबदारी आहे. घर, जमीन व आपले सर्वकाही सोडून लोक स्थलांतर करत आहेत. आपण लवकरच परत येऊ, असा त्यांना विश्वास आहे. सौदी अरेबियानी तर सीरियन निर्वासितांना आश्रय देण्याचे नाकारले आहे; पण जर्मनीने ३० हजारहून अधिक निर्वासितांना आश्रय दिला असून, २०० मशिदी बांधून देण्याची तयारी दाखवली आहे. सौदीची दांभिकता-ढोंगीपणा यातून दिसते.

पाश्चात्त्य देशांनी 'अतिरेक्यांना' मदत केली असल्यामुळे सीरियन लोक यादवी युद्धाने हैराण होऊन देश सोडत आहेत आणि यामुळे युरोपमध्ये निर्वासितांचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे मत गेल्या आठवड्यात बशीर अल असद यांनी व्यक्त केले. त्यांच्या म्हणण्यात तथ्य आहे. 'शत्रूचा शत्रू हा मित्र' हे धोरण अमेरिका आणि त्याच्या मित्रराष्ट्रांनी सोडले पाहिजे. अतिरेक्यांना मदत होईल, असे कुठलेही पाऊल कुठल्याही देशांनी उचलता कामा नये. यावर जागतिक स्तरावर एकमत व्हायला पाहिजे. असे झाले तरच दहशतवादापासून जगाला मुक्त करण्यात यश मिळेल.

**– जतिन देसाई**

jatindesai123gmail.com

(दैनिक 'मी मराठी' आणि लेखक
यांच्या सौजन्याने पुनर्मुद्रित)

# मोदींना मिळालेले आंतरराष्ट्रीय सन्मानाचं मोदक

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

अमेरिकन नियतकालिकांना विशिष्ट क्षेत्रातल्या सर्वोत्कृष्ट लोकांची किंवा गोष्टींची यादी प्रसिद्ध करून अंकांचा खप वाढविण्याची भारी सवय. फोरब्ज मासिक सर्वाधिक श्रीमंतांची यादी दरवर्षी प्रकाशित करते. यु.स. न्यूज अॅड वर्ल्ड रिपोर्ट देशातील सर्वाधिक गुणवत्तेच्या रुग्णालयांविषयी वाचकांना सुसंस्कृत करते तर बिझिनेस वुईक गुणात्मक विद्यापीठांची क्रमवारी देऊन विद्यार्थ्यांचं व्यवस्थापन शास्त्राविषयी (MBA) उद्‍बोधन करते. हॉलिवूडमध्ये कुठली नटी किंवा नट सर्वात जास्त पैसे कमावते हे देखील अमेरिकन लोकांना ठाऊक आहे. त्यामुळे फॉर्च्युन या जगविख्यात व अतिप्रतिष्ठित वित्त मासिकानं (एप्रिल १, २०१५) जगातल्या अतिप्रभावी नेत्यांची यादी प्रसिद्ध केली तेव्हा मुळीच नवल वाटलं नाही.

नवल वाटलं ते त्या यादीत आपल्या पंतप्रधानांचा जगात पाचवा नंबर लागला याचं. त्यामुळे भारताची गेल्या काही वर्षांत काळवंडलेली प्रतिमा उजळली. लोक आपल्या देशाकडे निराळ्या दृष्टीनं बघू लागले. या क्रमवारीतले पहिले तीन (अॅपलचा मुख्य टीम कूक, युरोपियन मध्यवर्ती बँकेचे प्रमुख मरिओ ड्राची व पोप फ्रान्सिस) राजकारणी नाहीत. चौथ्या क्रमांकावर चीनचे अध्यक्ष क्सी जिनपिंग व त्यानंतर मोदींचा नंबर लागला. म्हणजे राजकारण्यांमध्ये भारताला दुसऱ्या नंबरचा नेता लाभला असंच म्हणावं लागेल. भारताच्या इतिहासात देशाला प्रथमच नेतृत्वगुण असलेला नेता मिळाला असं जगविख्यात सल्लागार या १५ व्यवस्थापकीय शास्त्रावरील ग्रंथांचे लेखक रामचरण म्हणतात. त्यानंतर दोन आठवड्यांनी 'टाईम' या विख्यात साप्ताहिकानं जगातील १०० अतिप्रभावी व्यक्तीत मोदींचा समावेश केला. अशा पुरुषाला पंतप्रधानपदी निवडून देण्यात अल्पशिक्षित व अल्पमाहितीधारक समजल्या जाणाऱ्या आपल्या मतदारांनी जो सूज्ञपणा दाखवला तो वाखाणण्यासारखा आहे.

पण निवडणूक हे साध्य नसून साधन आहे. त्यापासून काय फलश्रुती झाली हे बघणं आवश्यक आहे. या पूर्वीच्या राजकारण्यांनी गेल्या सहा दशकापेक्षा अधिक काळ समाजवादी धोरण पाळून बिघडवलेलं अर्थकारण व भ्रष्टाचारग्रस्त राजकारण उण्यापुऱ्या एका वर्षात यक्षिणीची कांडी फिरवल्यासारखं एकदम सुधारेल असं समजणं हास्यास्पद ठरेल. तरी पण आपण योग्य मार्गानं व दिशेनं प्रवास करीत आहोत हे फॉरच्युन मासिकाच्या सन्मानानं सिद्ध होतं. मृतप्राय झाडाला पालवी फुटल्याची चिन्हं दिसतात. ती बघण्यासाठी पूर्वग्रहदूषित चष्मा काढून ठेवायला पाहिजे एवढंच.

मोदींनी जगभर कुविख्यात, अकार्यक्षम व नाकर्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय लोकशाहीला वेसण बांधले. इतिहासात प्रथमच ७७ उच्चपदस्थ सचिवांची बैठक घेऊन त्यांना विश्वासास घेतलं. असं करताना ते हेतूपूर्वक मंत्र्यांच्या डोक्यावरून गेले. भ्रष्टाचाराची सुरुवात मंत्री व सचिव यांच्या युतीतून होत असल्यामुळे त्यांनी सर्जकपणे हे संबंध तोडले. याची परिणिती म्हणजे गेल्या वर्षात केंद्रीय मंत्रालयात भ्रष्टाचार दृष्टोपत्तीस आला नाही.

यापूर्वीचं सरकार कोळसा घोटाळ्यात मानेपर्यंत बुडालं होतं आणि त्यात सापडलेले दोषी अजूनही कोर्टात भांडत आहेत. पण सध्याच्या सरकारनं परवा कोळशाच्या खाणींचे फेरलिलाव करून अवघ्या २० खाणींसाठी २ लाख कोटी रुपये मिळवून दिले. अजून १८४ खाणींचा लिलाव व्हायचा आहे. त्यामुळे देशाचा किती फायदा झाला हे लक्षात येईल. भारताच्या महालेखापालाच्या अहवालानुसार या घोटाळ्यात भारताचं १.७६ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं असं म्हटलं आहे. खरी हानी यापेक्षा कितीतरी जास्त होती हे उघड आहे. पण महत्त्वाचं म्हणजे या नवीन लिलावात भ्रष्टाचार होता असा आरोप कुणी केल्याचं मला माहीत नाही. यावरून भ्रष्टाचाराचे दिवस मागे पडले व जगभरात ही गुंतवणुकीसाठी एक कुवार बाजारपेठ आहे असं गृहीत धरू लागलं.

याची अनेक उदाहरणं देता येतील. पण प्रथम आपला देश कंगाल आहे हे मान्य करणं आवश्यक आहे. त्यामुळे परदेशी भांडवलाशिवाय तरणोपाय नाही. त्यासाठी गुंतवणूकयोग्य व उद्योगस्नेही वातावरण निर्माण करणं आवश्यक आहे. मोदी तसं करतील याविषयी जगाला आत्मविश्वास वाटत असावा. नाही तर अनेक देशांनी भारतात अब्जावधी डॉलरची गुंतवणूक करण्याच्या घोषणा कशाला केल्या असत्या? त्याची यादी लांब आहे. त्यामुळे

आंतरराष्ट्रीय पतसंस्थांनी भारताचा पतदर्जा वाढवला. मूडीज (Moody's) व फिच (Fitch) या संस्थांनी भारताला सकारात्मक दर्जा दिला.

सप्टेंबर २०१४ मध्ये जपाननं पुढील पाच वर्षांत ३.५ लाख कोटी रुपये (२९.३ अब्ज डॉलर) गुंतवणूक करण्याचं कबूल केलं. मोदींचे व जपानचे पंतप्रधान ॲबे यांचे संबंध फार जुने आहेत. तसंच चीननंही २० अब्ज डॉलरच्या योजना जाहीर केल्या. रशियानं भारतात अत्याधुनिक हेलिकॉप्टर्स बनवण्याचा कारखाना काढण्यास संमती दिली. त्यावेळी त्याच्या तंत्रज्ञानाचं हस्तांतरण भारतात होईल. फ्रान्सला एप्रिलमध्ये भेट देताना एअरबस कंपनीनं भारतात विमानाची जुळवणी करण्याचा बेत मोदींना सांगितला. अमेरिकेतल्या बहुदेशीय कंपन्या कायदेबदल झाला की भारतात गुंतवणूक करण्यास तयार आहेत. भूमीग्रहण व मजूर कायद्यात सुधारणा करून पूर्वलक्ष्यी कराला मूठमाती दिली की अमेरिकेवरून सर्वाधिक भांडवल भारतात येईल यात शंका नाही.

हे बघूनच की काय आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या जागतिक संस्थांनी भारताचा वाढदर २०१६ मध्ये चीनच्या पुढे असेल असं भाकीत केलं. चीनच्या अर्थकारणाला ग्रहण लागलं तर भारताच्या वाढदराला उभारी येत आहे. याचं सर्व श्रेय मोदींच्या धोरणाला द्यावं लागेल.

मोदींचं दुसरं प्राप्तव्य म्हणजे त्यांनी शेजारच्या देशांना भेट देऊन मैत्रीसंबंध प्रस्थापित केले. श्रीलंका, नेपाळ, जपान यांच्याशी सौख्याचं नातं जोडलं. चीनबरोबर सरहद्दी प्रश्नाविषयी सुरू असलेल्या वाटाघाटींना गतिमान केलं. पाकिस्तान अद्याप त्यांच्या मोहिनीच्या जाळ्यात सापडला नाही एवढंच.

मोदींसमोर मोठी आव्हानं उभी आहेत हे नाकारता येणार नाही. या समस्यांचं निराकारण करण्यासाठी त्यांना आपले नेतृत्वगुण पणाला लावावे लागतील. भूमीग्रहण कायद्यात महत्त्वाचे बदल केल्याशिवाय परदेशी गुंतवणुकीच्या घोषणांना मूर्तरूप येणार नाही. राज्यसभेत मताधिक्य नसल्यामुळे कुठलंही विधेयक पारीत होऊन त्याचा फायदा करणं कठीण आहे. या कायद्यासाठी तडजोड केली तर परदेशी गुंतवणूकदारांना ते अयोग्य वाटेल व ते आपली मूठ आवळून बसतील. तसंच त्यांनी मागच्या वर्षी विमाक्षेत्रात व संरक्षणसामग्री क्षेत्रात परदेशी गुंतवणुकीचं प्रमाण वाढवण्याचा अध्यादेश काढला होता. त्याची मुदत आता संपत आली आहे व राज्यसभेनं मान्यता दिली नाही तर जैसे थे होईल.

तसंच मजूर कायद्यात उद्योगसन्मुख बदल करणं आवश्यक आहे. जोपर्यंत कंपन्यांना आपल्या मजूरगणतीत मागणीनुसार कमीजास्त करण्याचे अधिकार नाहीत तोपर्यंत कुणीच मोठे कारखाने भारतात काढणार नाही. हे 'हायर अँड फायर' धोरण अमेरिकेत, इंग्लंड, कॅनडासारख्या आदी देशात आहे. महत्त्वाचं म्हणजे मजुरांची पूजा करणाऱ्या साम्यवादी चीनमध्ये ते आढळतं. मग त्याचं आपल्याला वावडं का?

आधुनिक विद्युत उपकरणं म्हणजे आयफोन, आयपॅड,



आयट्यून व आता नव्यानेच बाजारात आलेलं ॲपल घड्याळ, यांची बांधणी चीनमध्ये होते. त्यामुळे त्या देशात लाखो नव्हे तर दशलक्षावधी अल्पशिक्षित लोकांना नोकऱ्या मिळाल्या. 'Foxconn' नावाच्या तैवानीज कंपनीनं चीनमध्ये भव्य कारखाने उघडले. पण आपल्या कठोर मजूर कायद्यामुळे त्या कंपनीनं गुंतवणुकीसाठी भारताकडे ढुंकूनही बघितलं नाही. खरं म्हणजे भारतासाठी ही सुवर्णसंधी आहे कारण चीनमध्ये वाढत्या राहणीमानामुळे मजूरखर्च वाढत आहे. त्या वितदेशात दरतासी मजूर खर्च २०१ रु. (३.२४ डॉलर) तर भारतात तो ४०-५० रुपये आहे. त्यामुळे भारतात ही उपकरणं स्वस्त दरात बनवली जाऊ शकतात. पण त्याला हा मजूरकायदा आडवा येतो.

हे सर्व खरं असलं तरी मोदींच्या नेतृत्वामुळे देशाची मानसिकता बदलत आहे हे निर्विवाद. त्यांच्या नैतिक बळाचे परिणाम देशात दिसताहेत. जर्मनी-फ्रान्सच्या दौऱ्यात तिथल्या अनिवासी भारतीयांशी बोलताना भारतात उच्चभ्रू लोकांनाही गॅस सिलेंडरच्या बाबतीत सवलती का मिळतात असा प्रश्न त्यांनी काढला. ते कानावर पडताच पहिल्या काही दिवसातच साडेतीन लक्ष श्रीमंत लोकांनी या सवलतीचा त्याग करून कोट्यावधी रुपये वाचवले. ते आपण गरिबांसाठी वापरू असं मोदींनी आश्वासन दिलं हे त्यांच्या नैतिक बळाचं सामर्थ्य नाकारता येत नाही.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
2 Second Street, Unit # 2001,
Jersey City, NJ 07302
Tel : 567 868 9432
latalabh@aol.com

# अभिजात पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या





कादंबरी
किंमत १२० रुपये



समाजदर्शन
किंमत २५० रुपये




कादंबरी
किंमत १०० रुपये




कविता
किंमत ६० रुपये




कथा
किंमत १६० रुपये




कादंबरी
किंमत १०० रुपये




ललित लेख
किंमत २०० रुपये





समीक्षा
किंमत २०० रुपये



संगीतविषयक
किंमत १६० रुपये




कथा
किंमत २०० रुपये



आठवणी
किंमत २२० रुपये




समीक्षा
किंमत १५० रुपये

**मौज प्रकाशन गृह**, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ दूरध्वनी २३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com

# ...जाने क्या कहा मैंने?

## डॉ. लतिका भानुशाली



११ सप्टेंबर २०१५. सकाळपासून हृदयात एक अनामिक हूरहूर दाटून आलेली. विविध सुरांचे, शब्दांचे मोहोळ मनामध्ये फुटले होते. कोणीतरी दगड मारून त्याला उठवले होते. मला त्या मोहोळाला शांत करायचे नव्हतेच मुळी.

आम्ही 'बोस्कीयाना' या गुलजारजी यांच्या बंगल्यावर; पालीहिलकडे त्यांना भेटायला जात होतो. बांद्राचा 'चंदू हलवाई' ओलांडला आणि हृदयाची धडधड वाढू लागली. गाडी बाहेर रस्त्यावर उभी करून आम्ही बंगल्याच्या बाहेरच्या गेटची बेल दाबली. सुदेश हिंगलासपूरकर पुढे झाले. आतल्या माणसाने त्यांना पाहताच गेट उघडले.

मी मनाने चार वर्षे मागे गेले. डॉ. नरेंद्र जाधव लिखित 'भयशून्य चित्त जेथ' या रवींद्रनाथ टागोर लिखित कवितांच्या अनुवादाचे प्रकाशन होते. पुण्याला विद्यापीठामधील 'आयुका'चे सभागृह गच्च भरले होते. पांढराशुभ्र झब्बा-कुर्ता अशा पेहरावात गुलजारजी व्यासपीठावर आले आणि सभागृह थरारून उठले. मला पुस्तकावर आधारित समीक्षात्मक विवेचन मांडायचे होते!

त्या दिवशी मी पहिल्यांदा त्यांना पाहिले. 'मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा है' ओळी मनात घुमायला लागल्या. कधीही न पाहिलेली, कधीही न भेटलेली व्यक्ती इतकी जवळची का वाटते; मला कोडे सुटत नव्हते. कार्यक्रम संपल्यावर आमंत्रितांसाठी भोजन समारंभ आयोजित केला होता. एवढ्या रात्री पुणे-मुंबई प्रवास करायचा होता. तरीही जेवायला थांबले. टेबलावर एका कोपऱ्यात ते एकटेच अरुण शेवते यांच्याबरोबर शांतपणे बसले होते. माझी पुढे जाण्याची हिंमत होईना. शेवटी अरुण शेवते यांनी मला पुढे बोलावून घेतले. मी पुस्तकाची कॉपी सहीसाठी पुढे केली. त्यांनी पेनचा एक फटकारा मारला व माझ्या हातात पुस्तक परत दिले.

''बैठीये'' त्यांचा खर्जातला आवाज. शेवते यांनी मला त्यांच्या बाजूला जागा करून दिली. मी काहीतरी पुटपुटले. नेमके काय ते आठवत नाही. त्यांना जेवणाची थाळी आणली गेली. जेवता

जेवता डाळ संपल्याचे माझ्या लक्षात आले. सेवेची ही संधी मला सोडायची नव्हती.

''मी डाळ घेऊन येऊ का?'' काहीसे घाबरत मी विचारले. डाळीची भरलेली वाटी घेऊन येताना मध्येच कोणीतरी भेटले. मी पुस्तकावर केलेल्या भाष्यावर प्रतिक्रिया देत राहिले. मी थोडा वेळ संवादात रेंगाळले आणि परत गुलजारजींपाशी आले. डाळीची वाटी पुढ्यात ठेवून विचारले.

''और कुछ सरजी?'' माझी विचारणा.

''अच्छे घरकी बहु-बेटीयाँ रास्ते में अजनबीयोंके साथ बाते नही किया करती। समझता नही क्या?'' पुन्हा तोच खर्जातला आवाज.

माझ्या चेहऱ्यावर भलंमोठं प्रश्नचिन्ह? ते खळाळून हसले. ''आपको दाल लेना भेजा था ना? सीधे क्यू नही आयी? किससे बातें कर रही थी हाँ?'' मिश्किल स्वरात ते बोलले.

मला खुदकन हसू फुटले. इतका वेळ अडवून धरलेला संयम गळून गेला. मी मोठ्याने हसले.

''गुस्ताखी माँफ, फिरसे गलती नही होगी, दाल की बाटी लेकर सीधे आपही के पास आऊंगी.'' खट्याळपणे मी उद्गारले.

जेवता जेवता संवाद सुरू झाला.

''उपरवालेने इतनी प्रतिभा दी है आपको....'' माझे वाक्य मधेच तोडले गेले.

''कौन उपरवाला? ये सब मैंने लिखा है।''

त्यांनी परखड विचारसरणी मांडली. मग बराच वेळ गप्पा रंगल्या. हे क्षण संपूच नये असे वाटत होते.

आज चार वर्षांनी त्यांना पुन्हा भेटायला जात होते. निमित्त होते, 'बोस्कीच्या गोष्टी' या त्यांच्या बालसाहित्याच्या मराठी अनुवादांचे प्रकाशन. कार्यक्रमाची रूपरेषा त्यांच्याबरोबर चर्चा करून ठरवायची होती.

रस्त्यात सुदेश म्हणाला, की तुझी ओळख करून देताना अरुण शेवते यांनी पुण्याच्या कार्यक्रमाचा संदर्भ दिला तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर तत्काळ ओळखीचे भाव उमटले व त्यांनी मला घरी घेऊन येण्याची परवानगी शेवते यांना दिली.

'बोस्कीयाना'चे गेट उघडले. एका बाजूला बंगल्याकडे जाणारा रस्ता तर दुसऱ्या बाजूला छान हिरवळ राखलेली. हिरवळीवर गौतम बुद्ध पहुडलेले. चांगले सहा फूट उंच व पाच फूट रुंद! चपला बाहेर काढून आत गेलो. दिवाणखान्यात बसलो. ऐसपैस दिवाणखाना, भिंती अप्रतिम चित्रांनी भरून गेल्या होत्या. ठिकठिकाणी विविध मूर्ती, स्मृतिचिन्हे जपून ठेवली होती. हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणाऱ्या एका सम्राटाच्या साम्राज्याची ती खूण होती. दिवाणखान्याला लागून छोटी अभ्यासिका दिसत होती. पांढराशुभ्र झब्बा-कुर्ता अशा पेहरावातील गुलजारजी प्रसन्न चित्ताने फोनवर कुणाशीतरी संवाद साधत होते. तिथूनच त्यांनी हात उंचावला व पाचच मिनिटात संभाषण संपवून ते बाहेर आले.

मी संकोचून त्यांच्या समोरच्या सोफ्यावर बसले. मधे मोठा टिपॉय होता. बाजूला आणखीन दोन सोफे, असा सोफांचा आयत साधला होता.

''कार्यक्रम तूच करणार आहेस, तूच बोलून कार्यक्रमाची रूपरेषा नक्की कर'' शेवते उद्गारले. मी सोफ्यावरून संवाद साधायला सुरुवात केली. त्यांनी मधेच थांबवले.

''यहाँ बाजूमें बैठो'' माझी घाबरलेली मनोवस्था बहुधा त्यांनी हेरली. बोलताना माझे शब्द अडखळत होते. मी आयताच्या दुसऱ्या सोफ्याचा आधार घेतला.

''वहाँ नही. यहाँ पास बैठो.''

सुदेशने बीन बॅग उचलून दोन सोफ्यांच्या मधे ठेवली. मी त्यांच्या बाजूला स्थानापन्न झाले. त्यांनी पाठीवर आश्वासक हात ठेवला. जणू काही मला धीर देत होते. किती छोट्याशा कृतीने त्यांनी वातावरणातील ताण एकदम मोकळा केला. चहा मागवला. आग्रहाने प्यायला लावला.

माझे बोलणे संपल्यावर ते हसले. सुदेशने परत मोठ्या अपेक्षांचे ओझे माझ्या खांद्यावर भिरकावले. ''लतिकाही अँकरिंग करेगी। अब उसीपे सारा प्रोग्रॅम निर्भर है।''

मी उसनं बळ आणून आवंढा गिळला.


''मै जिम्मेदारी निभा लूँगी। आप चिंता न करे।''

ते सूचक हसले.

यंदापासून वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीचा 'ग्रंथाली' कार्यक्रमात सत्कार करायचा असा मानस ठरला होता. मूकबधिर मुलांसाठी कॉकलिअर इंम्प्लांट सर्जरीज विनामूल्य करून त्या बालकांना अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढणारे कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. प्रदीप उप्पल आमच्याबरोबर त्यांना भेटण्यासाठी आले होते. त्यांनी बोलायला सुरुवात केली पण गुलजारजींना या शस्त्रक्रियेविषयी आधीच माहिती होती. मुंबई, पुणे इथे अशी कामे करणाऱ्यांना ते ओळखत होते. सुरांच्या, शब्दांच्या जादुनगरीत रमणारा हा जादुगार वैद्यकीय क्षेत्राविषयी इतकी आपुलकी ठेवतो हे आम्हाला सुखावणारे होते.

त्यांचा निरोप घेऊन 'बोस्कीयाना' सोडला तेव्हा कुठेतरी अचानक लॉटरी लागावी आणि पैशाचे घबाड हाती लागावे अशी मनाची अवस्था होती. आयुष्यातील 'श्रीमंत क्षण' अचानक, अनपेक्षितपणे वाट्याला आले होते.

गेल्या अनेक दशकांपासून त्यांच्या कविता, त्यांनी लिहिलेली गाणी या सर्व गोष्टी रसिकांच्या मनात रोजच रुंजी घालताहेत. जीवनाच्या प्रत्येक वळणावर गुलजारजी आपल्याला भेटतात. कधी कवितांमधून, कधी गाण्यांमधून तर कधी चित्रपटांच्या माध्यमातून. त्यांच्याबरोबर रोजच चालणारा आपला हा प्रवास म्हणजे जन्मजन्मांतरीचं नातं आहे. त्यांनी निर्माण केलेली ही कलेची अफाट दुनिया आपल्या सर्वांसाठीच मर्मबंधातली ठेव आहे. एकाच वेळी वेगळ्या पिढ्यांमधील लोकांना आकर्षित करून घेण्याचं



विलक्षण सामर्थ्य त्यांच्या कलाकृतींमध्ये आहे.

मानवी जीवनातील मूलभूत, तरल, नितळ, सूक्ष्म, पवित्र अशा भावनांना ते शब्दांनी 'स्पर्श करतात' आणि 'देहभान विसरणे' म्हणजे काय याचा सामूहिक अनुभव आपण घेतो. रसिकांच्या चराचरातील भावविश्वाचा कोपरा न् कोपरा व्यापून टाकणारे असे हे अजब आणि अभूतपूर्व असे रसायन आहे.

त्यांच्या कलाकृतीला एकदा वाचून, एकदा पाहून, एकदा ऐकून सोडून देता येत नाही. वेगवेगळ्या पातळ्यांवर ह्या कलाकृती आपल्या मनात घोटाळत राहतात. घरीदारी, ट्रेनच्या गर्दीत, निसर्गाच्या सहवासात कामाच्या व्यस्ततेत, जेवताना, झोपताना, विश्रांती घेताना त्या आपला जीवघेणा पाठलाग करत राहतात. कधी अस्वस्थता, कधी परिपूर्णता, कधी अपूर्णता, कधी प्रेमानंद तर कधी निखळ बालसुलभ बालिशता अशा भावनांच्या हिंदोळ्यावर आपण झुलत राहतो; आणि ज्याने हे अफाट विश्व निर्माण केले त्या अलौकिक प्रतिभेपुढे आपण नतमस्तक होतो. त्यांना प्रत्यक्ष भेटल्यावर माझ्या मनात त्यांच्याच ओळी रुंजी घालू लागल्या.

'न जाने क्या था, जो कहना था आज मिलके तुझे
तुझे मिला था
तुझे मिला था मगर जाने क्या कहा मैने?'

समाज, निसर्ग, भक्ती, मृत्य, प्रेम, देशप्रेम, निरागसता अशा सर्वच प्रांतात त्यांची प्रतिभा मुक्तपणे विहरत राहते.

'हम को मन की शक्ती देना, मन विजय करे
दुसरों की जय से पहले खुद को जय करे'

असा मानवतावादी विचार ते मांडतात.

जगण्याची दुर्दम्य अभिलाषा प्रकट करणारे त्यांचे शब्द काळालाच आव्हान देतात; आणि ते म्हणतात.

'मैंने कल को तोड के लम्हा लम्हा जीना सीख लिया है'

मानवी जीवनातील अगतिकता स्पष्ट करताना त्यांची लेखणी भावूक होते.

'आईना देख के तसल्ली हुई
हम को इस घर में जानता है कोई'

विश्वकवी गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचा त्यांच्या साहित्यावर असलेला प्रभाव ते नाकारत नाहीत. एका गूळ विकणाऱ्या ग्रामीण माणसाच्या रूपकातून ते हे ऋण मान्य करतात. हा गूळ विकणारा माणूस गुळाची टोपली डोक्यावर घेऊन भर उन्हातून वाटचाल करत आहे. उन्हाने गूळ वितळू लागतो. त्याचे ओघळ कपाळावरून, गालांवरून ओठांवर येतात. मधाळ, गोड, ओलसर ओघळ चाटत चाटत तो गुळविक्या आनंदाने मार्गक्रमणा करत राहतो. गुलजारजी म्हणतात,

'मैं देहाती,
मेरे सर पे ये टैगोर की कविता की भेली किसने रख दी?'

प्रतिकूल संघर्षमय परिस्थिती सर्वांचीच परीक्षा पाहते. कधी कधी तर मानवी जीवन उद्ध्वस्त करते. पण या परिस्थितीला ते

ठणकावून सांगतात.

'मेरी खुदी को तुमने चंद चमत्कारोंसे मारना चाहा
मेरे इक प्यादे ने तेरा चांद का मोहरा मार दिया
मैने जिस्म का खोल उतार कर सौंप दिया
और रूह बचा ली'

भारतातील सामाजिक-आर्थिक विषमता त्यांना अस्वस्थ करते. ते लिहितात,

'हिंदुस्थानमें दो दो हिंदुस्थान दिखाई देते है
एक जिनका सर नये बादल में है
दुसरा जिनका सर अभी दलदल में है।'

समकालीन समाजावर भाष्य करताना ते चक्क उपहासाचा आधार घेतात,

'हाल-चाल ठीक-ठाक है
सब कुछ ठीक-ठाक है
बीए किया है। एम ए किया है।
काम नही है वरना
आपकी दुआ से सब ठीक ठाक है।
हवा देश की बहुत साफ है
कायदा है, कानून है, इन्साफ है
अल्लामियाँ जाने कोई जिए या मरे
आदमी को खून-वून सब माफ है।'

खरंतर प्रौढ वयाकडे झुकल्यावर सगळ्यांच्याच भावना निबर होत जातात. निरागसता संपून जाते. पण गुलजारजी परकाया प्रवेश करून सहज लहान मुलांच्या भावविश्वात रमतात आणि

'जंगल जंगल पता चला है
चड्डी पहन के फूल खिला है' अशा नितांत सुंदर ओळी लिहून जातात. 'लकडी की काठी, काठी पे घोडा' यांसारख्या त्यांच्या बालगीतांनी तर आबालवृद्धांना वेड लावले.

त्यांनी साकारलेली प्रेमाची विविध रूपे सर्वांनाच पावलोपावली अस्वस्थ करतात. 'प्यार को प्यार ही रहने दो कोई नाम न दो' म्हणत प्रेमाला ते आध्यात्मिक उंची बहाल करतात. 'बेचारा दिल क्या करे सावन जले, भादो जले' म्हणत तडफडणाऱ्या हृदयाची व्यथा मांडतात. प्रेमात सफलता मिळाली की 'आज कल पाव जमींपर नही पडते मेरे' म्हणत आपणही त्यांच्या शब्दांच्या आधारे हवेत तरंगायला लागतो. प्रेमी सोडून गेला तर जीवनाशी जुळवून घेतो खरं पण 'तेरे बिना जिंदगी से कोई शिकवा तो नही, तेरे बिना जिंदगी भी लेकीन जिंदगी तो नही' हे सनातन सत्य आळवत राहतो.

'एकसो सोला चाँद की रातें
एक तुम्हारा काँधे का तील' असे म्हणताना आपल्याला मात्र त्या 'एकशेसोळा चंद्राच्या रात्रींचा' हिशोब काही लागत नाही.

'मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा है
वो भिजवा दो, मेरा वो सामान लौटा दो' असं म्हणणारी



त्यांची लेखणी सर्वांनाच आपले इथेतिथे पडलेले 'सामान' आठवण्यास मजबूर करते.

'तुझसे नाराज नही जिंदगी हैरान हूँ' असं कितीही म्हटलं तरी 'जब भी ये दिल उदास होता है, जाने कौन आसपास होता है' हे आळवताना शंभर टक्के आपल्या आसपास गुलजारजींचेच शब्द असतात.

'जिहाले मस्कीन मैं कम बरंजीस,
बेहाल हिजरा बेचारा दिल है,
सुनाई देती है जिसकी धडकन
तुम्हारा दिल या हमारा दिल है' अशी प्रेमातील अद्वैत अवस्था आपण अनुभवतो.

साठीनंतर माणसांना निवृत्तीचे वेध लागतात. परमार्थाकडे तो वळतो आणि या वयात ते चक्क लिहितात,

'बिडी जलाईले, जिगर से पिया,
जिगर मा पडी आग है'

कधी 'जय हो' तर कधी 'लुंगी डान्स'. काय म्हणावे या जिंदादिल हृदयाला?

परिचय, कोशिश, मौसम, लेकिन, मेरे अपने, अचानक, खुशबू, किनारा, नमकीन, माचीस यांसारखे आशयघन चित्रपट देऊन त्यांनी अवघ्या हिंदी चित्रपटसृष्टीला समृद्ध करून सोडले. भारत-पाकिस्तान फाळणीवर आधारित 'रावी के इस पार' कथा आजही आपल्याला तितकीच विषण्ण करते. आदरणीय भूतपूर्व राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या आत्मचरित्रातील शब्दांना त्यांनी दिलेला आवाज म्हणजे एका महान व्यक्तीला दुसऱ्या एका महान व्यक्तीने दिलेली अलौकिक आदरांजली आहे.

'गुलजार' या नावातच जादू आहे. त्याला ओळखीची गरज नाही. तो आपल्या जगण्याचा 'श्वास' आहे!

**- डॉ. लतिका भानुशाली**
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८
latikabhanushali@yahoo.co.in


## डॉ. रा.चिं.ढेरे यांचे महान ग्रंथ



महाराष्ट्राच्या शैव विचारधारांवर श्रीपर्वताचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष पण अत्यंत गाढ परिणाम आहे. श्रीपर्वताच्या छायेत महाराष्ट्रातल्या धार्मिक-सांस्कृतिक इतिहासातले काही महत्त्वाचे दुवे या ग्रंथात नव्याने उलगडले आहेत आणि काही कूट रहस्यांवरही नवा प्रकाश टाकला आहे.

**श्रीपर्वताच्या छायेत**

किंमत ₹ ३१०



गाणपत्य, जैन आणि मुकुंदराज ह्या तीन परंपरातील ग्रंथकारांचा आणि ग्रंथकृतींचा मागोवा घेणारा ग्रंथ.
प्राचीन मराठी साहित्याच्या सामर्थ्याची, सौंदर्याची आणि भक्तिभावनेच्या अखंड सूत्राची जाणीव करून देणारा ग्रंथ.

**त्रिविधा**

प्राचीन मराठीच्या तीन साहित्यधारा

किंमत ₹ २००



मराठीतील नामदेव आणि नामदेव परिवार यांच्याविषयीच्या साहित्यात भर घालतानाच 'जनी'चे लौकिक व वाङ्मयीन चरित्र तर नागरीचे आत्मकथन.

**श्रीनामदेव जनी आणि नागरी**

किंमत ₹ १३०

१९ पुस्तकांची एकत्रित
किंमत ₹ ५०३०
सवलतीत ₹ ३७७०

सर्व पुस्तकांवर २०% सवलत

| | | | |
|---|---|---|---|
| **श्रीतुळजाभवानी** किंमत ₹ ६०० | **करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी** किंमत ₹ ४५० | **कन्नागीरी** किंमत ₹ ३०० | **श्रीवेंकटेश्वर आणि श्रीकालहस्तीश्वर** किंमत ₹ ४०० |
| **श्रीविठ्ठल : एक महासमन्वय** किंमत ₹ ४०० | **नाथ संप्रदायाचा इतिहास** किंमत ₹ २८० | **दत्त संप्रदायाचा इतिहास** किंमत ₹ २६० | **दक्षिणेचा लोकदेव श्रीखंडोबा** किंमत ₹ २०० |
| **लोकदैवतांचे विश्व** किंमत ₹ २३० | **संत, लोक आणि अभिजन** किंमत ₹ २५० | **भारतीय रंगभूमीच्या शोधात** किंमत ₹ २५० | **मुसलमान मराठी संतकवी** किंमत ₹ १७० |
| **लोकसंस्कृतीचे उपासक** किंमत ₹ २१० | **लोकसाहित्य शोध आणि समीक्षा** किंमत ₹ १७० | **आज्ञापत्र** किंमत ₹ १४० | **श्रीआनंदनायकी** किंमत ₹ ८० |

**पद्मगंधा प्रकाशन** १९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० www.padmagandha.com
फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९१७६ E-mail : p.padmagandha@gmail.com

# ठाण्यात बाल-गुलज़ार

**प्रतिनिधी**




१५ सप्टेंबर २०१५ रोजी ठाण्याच्या गडकरी रंगायतनमध्ये 'बोस्कीच्या गोष्टी' या ख्यातनाम गीतकार-दिग्दर्शक-कवी गुलजारजी लिखित बालसाहित्याच्या अनुवादाचे प्रकाशन झाले. पुस्तकांचे प्रकाशन करण्यासाठी दस्तुरखुद्द गुलजारजी ठाण्यात उपस्थित होते. या साहित्याचे अभिवाचन करण्यासाठी अभिनेत्री अमृता सुभाष, अभिनेते-दिग्दर्शक संदेश कुलकर्णी हे बच्चे कंपनीसाठी खास ठाण्यात आले होते. ठाणेकरांसाठी हा सोहळा म्हणजे खरोखरच दुग्धर्शकरा योग ठरला!

गणपतीच्या आधीचे दोन दिवस; तरी ठाण्याचे गडकरी रंगायतन गर्दीने ओसंडून वाहत होते. जागा न मिळालेल्यांनी पायऱ्यांवर बसून किंवा उभ्याने गुलजारजी यांनी पाहणे व ऐकणे पसंत केले.

ही नऊ पुस्तकं म्हणजे गुलजारजी यांची कन्या बोस्की अर्थात मेघना गुलजार हिच्या प्रत्येक वाढदिवसाला त्यांनी तिला भेट म्हणून दिलेली एकेक साहित्यकृती होय. या पुस्तकांना आता मराठीत घेऊन येण्यामागची भूमिका 'ग्रंथाली'च्या वतीने डॉ. लतिका भानुशाली यांनी स्पष्ट केली. ''मराठीतील एकूण बालसाहित्याचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की काही सन्माननीय अपवाद वगळता उत्तम दर्जेदार बालसाहित्य मराठीत फारसे निर्माण होताना दिसत नाही. जे साहित्य सध्या आहे ते बरेचसे बोधवादी, उपदेशपर, आदर्शवादी या स्वरूपात आहे. या पार्श्वभूमीवर मुलांचे निखळ मनोरंजन करणारी, त्यांना बालसुलभ अद्भूत विश्वात घेऊन जाणारी, त्यांचे भावविश्व समृद्ध आणि संपन्न करणारी ही पुस्तके मराठीत येणे गरजेचे होते'' असे मत त्यांनी मांडले.

या कार्यक्रमासाठी ठाणे महानगरपालिका आणि ठाण्यातील खाजगी शाळा अशा शाळांचे साडेचारशे विद्यार्थी उपस्थित होते. अमृता सुभाष व संदेश कुलकर्णी यांनी या पुस्तकांमधील कथांचे केलेले अभिवाचन हा कार्यक्रमाचा उत्कर्षबिंदू ठरला.

बोबडे बोल बोलत संदेश कुलकर्णी यांनी वाचलेली 'बोस्की' ही कथा मुलांना खूप हसवून गेली.

'बोस्कीचे अजब गजब धनवान', 'बोस्कीचे तळपाताळ' या गोष्टींनी मुलांमध्ये धमाल उडवून दिली तर 'बोस्कीची सुनाली'

या कथेतील करुण रसाने मुलंच नव्हे तर गुलजारजींसह संपूर्ण सभागृह हळवे झाले.

ही पुस्तके अनुवादित करण्याची नेमकी कल्पना कुठून आली, त्या कल्पनेची अंमलबजावणी कशी झाली याची कहाणी 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि कवी अरुण शेवते यांच्या यांच्या भाषणातून उलगडली गेली.

'बोस्कीच्या गोष्टी'च्या मराठी रंगीबेरंगी चित्रित अनुवादांवर गुलजारजी बेहद खुश होते. बालसाहित्याची इतकी देखणी पुस्तके हिंदीत सुद्धा नाहीत अशी पावती त्यांनी जाहीरपणे व्यासपीठावरून दिली. मुलांशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधत साधत त्यांनी बालकवितांचे सादरीकरण केले. 'दो की गिनती' या कवितेला सादर करताना त्यांनी मुलांनाच नव्हे तर प्रौढ प्रेक्षकांना सुद्धा 'दोना'ची गणिते करायला लावली. मुलांमध्ये मूल बनून रमून गेलेल्या गुलजारजींना ऐकणे ही रसिकांसाठी आनंदाची पर्वणी होती. शेवटी, 'किताबे झाँकती है, बंद अलमारी के शीशे से' ही कविता त्यांनी प्रौढांसाठी सादर केली आणि सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले. ''या पुस्तकांमधील काही कथा या पंचतंत्र तसेच पाश्चात्य पुराणकथा यातून मी घेतल्या आहेत. फक्त त्याचे भारतीयीकरण केले आहे'' अशी नम्र कबुली त्यांनी दिली.

लतिका भानुशाली यांनी करून दिलेल्या परिचयाला अतिशय नम्रतेने उत्तर देताना ते म्हणाले, ''जिस अंदाज से आपने ये परिचय दिया है, लोगोंकी अपेक्षाएँ बढ गयी है। अब इस कसौटीपर खरा उतरना बडा मुश्कील हो जाएगा।''

अंबरीश मिश्र यांनी उर्दूमिश्रित हिंदीने कार्यक्रमात बहार उडवून दिली. आपला नातू 'समय' याला शाळेतून येताना बसस्टॉपवर ते कसे अजूनही जातात ही खाजगी गोष्ट सांगून त्यांच्यातील आजोबांना त्यांनी न्याय दिला. या लहानग्याच्या भाग्याचा हेवा करताना ते म्हणाले, ''समय जब अपनी दादा की गोद में सोता होगा तो उसे पताही नहीं होगा की वो एक 'कालपुरुष' की गोदी में सोया है।''



गुलजारजींशी सानवीचा संवाद

या पुस्तकांचे प्रकाशन लहान मुलांच्या हस्ते व्हावे या गुलजारजी यांच्या कल्पनेनुसार पुस्तक प्रकाशन सानवी माजारे या चिमुरडीच्या हस्ते करण्यात आले. परमेश्वराने 'ऐकण्याचा व बोलण्याचा' अधिकार नाकारलेला असताना सुद्धा तंत्रज्ञान आणि वैद्यकीयशास्त्राच्या मदतीने ही शक्ती परत मिळवणारी ती ठाणे जिल्ह्यातील पहिली मुलगी ठरली. तिच्या मेंदू व कानाच्या मध्ये धातूची छोटी चकती बसवून त्या चकतीमार्फत ध्वनी तिच्यापर्यंत पोचवले गेले व ती चक्क बोलू लागली. सामान्य मुलांच्या शाळेत प्रगती करू लागली.

अशा प्रकारची कॉकलिअर इंम्प्लांट सर्जरी मोफत करणारे ठाण्यातील पहिले आणि एकमेव डॉक्टर म्हणजे ठाण्याचे सुप्रसिद्ध-नामांकित कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. प्रदीप उप्पल यांचा या कार्यक्रमात गुलजारजी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. आपल्या सत्काराला उत्तर देताना डॉक्टर अत्यंत भावुक होऊन म्हणाले, ''जर हा श्रवणदोष लहानपणीच लक्षात आला तरच आम्ही ही सर्जरी यशस्वी करू शकतो पण वयाच्या चार-पाच वर्षांनंतर याचा उपयोग होत नाही.'' यासाठी पालक-शिक्षक, बालरोगतज्ज्ञ यांनी दक्ष असणे गरजेचे आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. सानवी ही असे ऑपरेशन केलेली त्यांची पहिली पेशंट!



या कथांचे अनुवादक उषा मेहता, अंबरीश मिश्र, अमृता सुभाष, मधुकर धर्मापुरीकर, किशोर मेढे, सविता दामले, विजय पाडळकर, संवेदनशील नागरिक श्री. पी.के. गुहा यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

●

# स्वत:ला हसणे हाच श्रेष्ठ विनोद!

## ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांचे मत

स्वत:ला हसणे, स्वत:चे उन्नयन करणे हाच विनोद सर्वात श्रेष्ठ असून दुसऱ्यांना हसून केलेला विनोद श्रेष्ठ नसतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांनी केले. ग्रंथसखा वाचनालयातर्फे आयोजित व 'ग्रंथाली' प्रकाशित 'हसिक-रसिक' या विनोदी कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. अमेरिकास्थित लेखिका प्रगती कोळगे यांच्या या चौथ्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला सहलेखक व व्याख्याते प्रा. मिलिंद जोशी, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर, महाराष्ट्र भाषा सल्लागार समितीचे सदस्य अरुण जोशी, ग्रंथसखा वाचनालयाचे श्याम जोशी, उपनगराध्यक्ष श्रीधर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदिका डॉ. लतिका भानुशाली यांनी केले.




**हसिक-रसिक या विनोदी कथासंग्रहाच्या प्रकाशन समयी ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे बोलताना.**

या विनोदी कथासंग्रहाच्या प्रकाशनावेळी बोलताना सासणे म्हणाले की, भारतात विनोदाची प्राचीन परंपरा आहे. सकाळी उठून उद्यानात जाऊन हसण्यापेक्षा निर्मळ विनोदाने हसणे आनंददायी आहे. हा कथासंग्रह लिहिताना कोळगे यांनी सूक्ष्म व साध्या शैलीने पुस्तकाचे लेखन केले असून यात त्यांची निकोप वृत्ती दिसून आली आहे. अशा निकोप वृत्तीतूनच हे उत्तम विनोदी लेखन झाले आहे. या कथासंग्रहात अनेक सौंदर्यपूर्ण प्रसंग असून सूक्ष्म निरीक्षण, भाषिक ज्ञान, आकलन या जोरावर हे पुस्तक परिपूर्ण झाले असून लेखिकेने लवकरच विनोदी कादंबरीकडे कळावे, अशी माझी विनंती आहे, असे ते म्हणाले. यावेळी प्रगती कोळगे यांनी 'ग्रंथाली'कडून प्रेरणा घेत लेखन केले असून माझ्या आजारपणात लिखाणाने मला साथ देत मला संजीवनी दिल्याचे सांगितले. अमेरिकेतून समाज माध्यमांमधून भारतीयांशी संवाद साधण्याचे त्यांचे अनुभव यावेळी त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे वक्ते प्रा. मिलिंद जोशी म्हणाले की, कोळगेंच्या कथासंग्रहातील विनोद हा बोचकारणारा नसून गुदगुल्या करणारा आहे. विनोदबुद्धी संपणं हे समाजाचे खच्चीकरण करणारे लक्षण असून या 'हसिक-रसिक' पुस्तकाने समाजातील मने निखळ हास्याने खुलतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी कोळगे व जोशी हे पेशाने अभियंते असून दोघेही मराठवाड्यातील असल्याने जोशी म्हणाले की, ही मराठवाड्याची धूळ आहे व ती साहित्य विश्वाला नक्की व्यापून टाकेल. यासाठी उदाहरणादाखल त्यांनी नांदेडमधील एका संमेलनात आचार्य अत्रे व पु.ल. देशपांडे यांच्यात मराठवाड्यातील धुळीच्या रस्त्यांवरून घडलेला रंजक किस्सा रसिकांना सांगितला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्याम जोशी यांनी केले. ●

## कार्यकारणभाव : समाज आणि साहित्य

अर्जुन डांगळे

माझ्या समीक्षात्मक लेखनात नितळपणा जपण्याचा मी प्रयत्न करतो. माझी सावली त्या लिखाणावर पडणार नाही किंवा दुसऱ्याची सावली त्याच्यावर पडणार नाही याची मी दक्षता घेतो. आणि मला ते शक्य होते कारण मी कोणत्याही साहित्यिक कंपूत नाही. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारविश्‍व हाच माझा विचार कंपू होय.

- अर्जुन डांगळे

पाने : १८८ / किंमत : ₹ २२०




## रघुनंदन त्रिवेदी यांच्या कथा

अनुवाद : जयप्रकाश सावंत

रघुनंदन त्रिवेदींच्या कथांचा सूर विलक्षण समंजस, धीमा आणि हळुवार आहे. या कथांमधली पात्रं भय आणि कातरता घेऊनच जगणारी आहेत. त्रिवेदींच्या भावुकतेची, हळव्या मनाची आणि आंतरिक कळवळ्याची तुलना मराठीतल्या साने गुरुजींशीच होऊ शकते.

- जयंत पवार

पाने : १७६ / किंमत : ₹ २००

# लोकवाङ्मय गृह

## नवी पुस्तके

## गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका

अरुण खोपकर



रसिकमान्य, विद्वज्जनांनी वाखाणलेले, सिनेमावरील सर्वोत्कृष्ट लेखनाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळालेले पहिले मराठी पुस्तक. हिंदी, इंग्रजी, इटालिअन आणि फ्रेंच भाषांत अनुवादित. नवे लेखन व नवी छायाचित्रे यांसहित. शब्दार्थ आणि चित्रार्थ यांना नव्या लयीत बांधलेल्या देखण्या ग्रंथरूपातली नवी आवृत्ती.

पाने : २७८ / किंमत : ₹ ४५०

पुठ्ठाबांधणी

पिपल्स बुक हाऊस :
१५, मेहेर हाऊस, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
✆ २२८७ ३७६८

लोकवाङ्मय गृह :
भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
✆ २४३६ २४७४ / फॅक्स : २४३१ ३२२०.
E-mail : lokvangmayagriha@gmail.com

आमची निवडक पुस्तके
BookGanga.com/newshunt.com
वर उपलब्ध आहेत.

## मराठीतील स्त्रियांची कविता

प्रभा गणोरकर

कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात स्त्रिया लिहीत आहेत, त्यांच्या कवितेच्या आशयात, काव्यविषयक दृष्टिकोनात, शैलीत कसकसे बदल होत आले आहेत आणि मराठीच्या प्रदीर्घ काव्यपरंपरेत स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करणारी स्त्रियांची कविता आज कोणत्या टप्प्यावर उभी आहे याची चिकित्सा करणारा ग्रंथ.

पाने : २६८ / किंमत : ₹ ३२०




## पायपीट

सतीश काळसेकर

'वाचणाऱ्याची रोजनिशी' या वाचकप्रिय ठरलेल्या गद्यलेखनानंतरचे, कवी सतीश काळसेकर यांनी गेली पन्नासहून अधिक वर्षं देशात केलेल्या भ्रमंतीच्या अनुभवावर आधारित असलेले नवे पुस्तक. मराठी साहित्यात प्रचलित असलेल्या प्रवासवर्णनांपेक्षा काहीसे निराळे प्रवासवर्णन.

पाने : २३६ / किंमत : ₹ २५०

# वाचा आणि उत्तरे मिळवा

एकदा वाचायला सुरूवात केली की, माणसाला भरपूर प्रश्न पडतात. त्याची उत्तरे मिळविण्यासाठी आणखी वाचन करण्याची धडपड वाढते. वाचनातून आत्मभान मिळाले की, हजारो वर्षांचा पगडा असलेल्या अमानवी रूढी-परंपरांना विरोध करण्याचे बळ आपोआप माणसाच्या ठायी येते, असे परखड मत मुंबई येथील प्राध्यापिका लतिका भानुशाली यांनी व्यक्त केले. प्रकट वाचन, मूक वाचन त्यातून निर्माण होणारा चिंतनशीलतेचा प्रवास, त्यानंतर येणारे आकलन, असे विविध टप्पे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांसमोर मांडले. तथ्य नसलेल्या रूढी परंपरांना विरोध करण्यासाठी वाचनाशिवाय पर्याय नाही, असे सांगून विचारांची श्रीमंती हवी असेल तर वाचन हाच एकमेव पर्याय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अलीकडच्या काळात काही भरकटलेले




**लतिका भानुशाली यांनी वाचनप्रेमी मुलांशी छान संवाद साधला.**
**यावेळी व्यासपीठावर सुदेश हिंगलासपूरकर, प्रगती कोळगे, दयानंद माने आणि आल्हाद गोडबोले उपस्थित होते.**

मेंदू वाचनातून समाजाला आत्मभान येऊ नये यासाठी टोकाची हिंसा करीत सुटले आहेत. डॉ. दाभोळकर, पानसरे आणि कलबुर्गी यांची हत्या म्हणजे समाजाला योग्य ते वाचण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या साध्या सरळ माणसांची हत्या असल्याचे त्यांनी सांगितले.

उस्मानाबाद शहरातील यशश्री क्लासेसच्या सभागृहात रविवारी सरस भारत अकादमी, प्रगती सहकारी संस्था, यशश्री क्लासेस आणि ग्रंथाली प्रकाशनच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या वाचन विचार संस्कृती या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी ज्येष्ठ पत्रकार आल्हाद गोडबोले, दयानंद माने, लेखिका प्रगती कोळगे आणि ग्रंथाली प्रकाशनचे सुदेश हिंगलासपूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सभागृहात उपस्थित असलेल्या विद्यार्थी आणि रसिक वाचकांना प्रा. भानुशाली यांनी रसिकश्रोत्यांना आपलेसे करीत वाचनविषयक अनेक बाबी सोप्या शब्दांत समजावून सांगितल्या.


आपल्या पत्रकारितेच्या एकूण जीवनाला वाचनामुळेच दिशा मिळाली, विचाराची श्रीमंती लाभली, त्यामुळेच समाजाला भरभरून देता आले, असे मत ज्येष्ठ पत्रकार आल्हाद गोडबोले यांनी व्यक्त केले. आपल्या भाषेत लिहायला सुरुवात करा. एक दिवस आपली शैली जगाला भुरळ पाडल्याशिवाय राहणार नाही, असे आवाहन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. दयानंद माने यांनी त्यांच्या

लेखनामागील प्रेरणा सोप्या शब्दांत विद्यार्थ्यांसमोर मांडल्या. याच परिसरातील घटना, घडामोडींचे वाचकांची पत्रे या सदरात विद्यार्थी दशेत केलेले विवेचन आपल्याला पत्रकारितेच्या क्षेत्रात घेऊन येण्यास किती महत्वाचे ठरले, याबाबत सांगून लिहिते व्हा, असे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले.

लेखिका प्रगती कोळगे यांनी विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तराच्या स्वरूपात मनमोकळ्या गप्पा मारल्या. तुमच्यातूनच उद्या एखादा मोठा साहित्यिक निर्माण होणार आहे. त्यासाठी भरपूर अवांतर वाचन करा, असेही त्यांनी म्हटले. ग्रंथाली प्रकाशनच्यावतीने ख्यातनाम कवी गुलजार यांच्या पुस्तकांचा संच लवकरच प्रकाशित होत आहे. लहान मुलांना त्यांच्या भाषेत गुलजार यांनी लिहिलेले साहित्य उपलब्ध व्हावे यासाठी ग्रंथालीने हे सर्व संच मराठी भाषेतून उपलब्ध करवून दिले आहेत. हे संच विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात यावेळी उपलब्ध करवून दिले असल्याची माहिती सुदेश हिंगलासपूरकर यांनी दिली. यावेळी हे संच विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी उपस्थितांना विविध विषयातील पुस्तके हाताळता यावीत, विकत घेता यावीत यासाठी ग्रंथालीच्या वतीने पुस्तक प्रदर्शनही लावण्यात आले होते. विद्यार्थी आणि रसिकांनी या ग्रंथ प्रदर्शनाला मोठी गर्दी केली होती. उस्मानाबाद शहरात सरस भारत अकादमीच्यावतीने सुरू असलेल्या वाचन विषयक चळवळीबाबत प्रा. रवि निंबाळकर यांनी उपस्थितांना माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन रविंद्र केसकर यांनी तर आभार दौलत निपाणीकर यांनी मानले. यावेळी प्रगती सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रशांत पाटील, माजी नगरसेवक दर्शन कोळगे, शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मार्गदर्शक विष्णू इंगळे, मसापचे कार्याध्यक्ष राजेंद्र अत्रे यांच्यासह रसिक श्रोते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ●


ग्रंथाली

## मराठा मुलगी - डॉ. शैलजा वाडीकर




**मूल्य १८० रु.**
**सवलतीत ११० रु.**

दु:ख सहन करणं वाटतं तितकं सोपं नसलं, तरीही अवघडाशी दोन हात करणं या रणात पुन्हा एकदा दु:ख पाठीशी असतं, हा आधार ज्याच्या-त्याच्या इतिहासातून प्रत्येकालाच मूळ कागदपत्राप्रमाणं फार जपावा लागतो. जगणं हे जिवाला नवीन नसलं तरी जगण्याच्या लढाईत जिवाला मागे हटता येत नाही. जगणं हे असं एक युद्ध आहे, की जिथून पराभवानंतर पाय मागे घेण्याची सोय असूनही इच्छा बाळगता येत नाही. युद्धासारखं जगणं असो, की जगण्यातलं प्रत्येक प्रहराचं दु:ख असो, आयुष्य अंगणाशी जोडूनच ठेवावं लागतं. कोणाच्या वाट्याला कोणत्या घराचं अंगण येईल, याची पायांनाही कल्पना नसते. म्हणूनच प्राक्तनाच्या पायवाटेवरून प्रवास करताना पाय प्राणाशी पहाटेनं जोडून घ्यावे लागतात. अंधारयात्रेच्या प्रवासातला तो क्षण म्हणजेही प्राणाचीच पताका असते. या अशा सर्व संवेदनांचं हे लेखन जणू जगण्याला फडकावत, जगाला धक्का देणारं ध्वजारोहणच आहे. स्वातंत्र्याच्या दोरीला जोडलेले आणि वाऱ्यालाही न जुमानणारे ध्वज मुहूर्तापुरतेच मेढीवर असतात ही शोकांतिका कुणी कुणाला, केव्हा, कशी, कुठे सांगायची हा जरी मुख्यत: स्त्रियांच्या सोसण्याचा भाग असला, तरी एका मराठा मुलीनं साहस दाखवलं आणि ध्वजारोहण केलं; तीच ही मराठा मुलगी!

**– फ. मुं. शिंदे**

**डॉ. शैलजा वाडीकर लिखित** आणि **'ग्रंथाली' प्रकाशित**

**मराठा मुलगी** आणि **एकटं असण्याची गोष्ट**

**या दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ**

हस्ते : **मा. कमलकिशोर कदम** (माजी शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य)
अध्यक्ष : **मा. डॉ. पंडित विद्यासागर** (कुलगुरू, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड)
भाष्य : **डॉ. वृषाली किन्हाळकर** (ख्यातकीर्त कवयित्री)
**फ.मु. शिंदे** (माजी अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन)


शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०१५, सायं. ५.३० वा.
नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, नांदेड

**★ सर्वांना आग्रहाचे निमंत्रण ★**

ग्रंथाली

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे दलितेतर सहकारी

ग्रंथ प्रकाशन सोहळा




**मा. सुशीलकुमारजी शिंदे**
माजी केंद्रीय गृहमंत्री
यांचे शुभहस्ते होत आहे

-: प्रमुख व्याख्यान :-
**प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे**
ज्येष्ठ विचारवंत, अभ्यासक आणि साहित्यिक

**प्रा. डॉ. वंदना सोनाळकर**
महिला अभ्यास व विकास केंद्र
टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स

-: विशेष उपस्थिती :-
**मा. श्री. आर.जी. राजन**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक : राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलाईझर्स लि.

**सूत्रसंचालन : संजय भुस्कूटे**

शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०१५ रोजी, सायंकाळी ६ वाजता
दादर-माटुंगा कल्चरल सेंटरचा एसी हॉल, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाशेजारी, माटुंगा (प.), मुंबई १६ येथे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दलितोद्धाराच्या कार्यास मदत केली म्हणून समाजाने अनेक वर्षे वाळीत टाकले. त्यांना नि त्यांच्या कुटुंबियांचा अनेक मार्गांनी छळ केला. सवर्ण म्हणविणाऱ्यांनी त्यांच्यावर कोर्टात अनेक खोटे खटले दाखल केले. तरीही कशा कशाची पर्वा न करता या अतिविश्वासू दलितेतर शिलेदारांनी बाबासाहेबांची साथ सोडली नाही. मात्र आतापर्यंत त्यांच्या कार्याची म्हणावी तशी दखल घेतली गेली नव्हती. हा ग्रंथ वाचल्यानंतर प्रश्न पडतो बाबासाहेबांना सुरुवातीच्या काळात या दलितेतरांनी दलितोद्धाराच्या कार्यास खंबीरपणे साथ दिली नसली तर....???

**योगीराज बागूल यांनी अतिशय परिश्रमाने साकारलेली ही साहित्यकृती**

**निमंत्रक : धनंजय गांगल, सुदेश हिंगलासपूरकर**

**मूल्य ३०० रु. ● सवलतीत १५० रु.**

**★ सर्वांना आग्रहाचे निमंत्रण ★**


## वाचकांसाठी बालसाहित्याचा अपूर्व नजराणा




अनुवाद : उषा मेहता




अनुवाद : अंबरीश मिश्र





अनुवाद : किशोर मेढे




अनुवाद : अमृता सुभाष




अनुवाद : अमृता सुभाष





अनुवाद : सविता दामले




अनुवाद : मधुकर धर्मापुरीकर




अनुवाद : मधुकर धर्मापुरीकर





अनुवाद : विजय पाडळकर

**सर्व पुस्तकांची मुखपृष्ठे व मांडणी : पुंडलिक वझे**

**संचाची मूळ किंमत १००० रु. ● संच सवलत किंमत ६०० रु.**

मौज प्रकाशन

# ग्रंथपान







नामवंत नाटककार महेश एलकुंचवार यांचा 'मौनराग' हा पहिलाच ललित लेखसंग्रह.

जीवन जाणून घेण्याच्या उत्कट प्रेरणेने, वेळोवेळी आलेल्या अनुभवांचे मनोज्ञ चित्रण एलकुंचवार इथे घडवतात.

संस्कृत आणि इंग्रजी वाङ्मय, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, नाट्य, चित्रपट, चित्र, संगीत आदींचे संदर्भ इथे भेटतात आणि वाचकाला समृद्ध वाचनाचा आनंद देतात.

प्रतिभेचे वरदान लाभलेल्या या लेखनाला विचारगर्भतेचे एक अधिक परिमाण लाभलेले आहे.

मराठीतल्या ललित लेखनाची परंपरा उंचावणारे 'मौनराग' वाचताना वाचक हेलावून जाईल.

मूल्य १५० रु.   ग्रंथाली येथे सवलतीत १२० रु.

'त्रिबंध' हा श्री. महेश एलकुंचवार यांचा दुसरा ललित लेखसंग्रह. 'मौनराग'नंतरचा आणि सर्वार्थाने त्यापलीकडे जाणारा. ललितकला आणि ज्ञानशाखांच्या संयोगभूमीतून असे स्वायत्तविश्व इथे साकारते की स्वप्न, कल्पित आणि वास्तवाच्या सीमारेषा परस्परात विरून जातात. आपले विश्वाचे आकलन त्रि-मितीय जाणीव ओलांडून अपाराकडे झेपावते.


मानवी जाणीव-नेणिवेच्या नानाविध पातळ्यांना व्यक्तिरूप मिळून प्रत्यक्षातील, कलाकृतींमधील आणि कलावंताच्या मनात विकसित होत जाणार्या व्यक्तिरेखांमधील आत्मीय संवाद असेही रूप या ललितलेखांमध्ये अनुभवायला मिळते. कलानिर्मितीविषयीच्या अनेक गहन प्रश्नांचे प्रतिबिंब या संवादामध्ये पडलेले आहे.

आपल्या जगण्यातील अनेक बंद खिडक्या उघडणारे हे लेखन आपल्या प्रातिभ बळाने मौलिक क्षणात कोंडलेले शाश्वत प्रकाशमान करते.

मूल्य १६० रु.   ग्रंथाली येथे सवलतीत १३० रु.

रोहन प्रकाशन

# ग्रंथपान







**माझा मोटिव्हेटर मित्र!**

आयुष्यात नेहमी साथ व स्फूर्ती देणारा आपला वैयक्तिक मोटिव्हेटर मार्गदर्शक – अतुल राजोळी

यशस्वी होण्याची पहिली पायरी असते एखादी गोष्ट करण्यासाठी प्रवृत्त होणं! त्यानंतरच आपल्या प्रयत्नांना मेहनतीची जोड देऊन आपलं ठरवलेलं उद्दिष्ट गाठता येऊ शकतं. आणि म्हणूनच यशोप्राप्तीच्या मार्गात आवश्यकता असते ती, उद्युक्त करणाऱ्या, प्रेरणा देणाऱ्या एखाद्या मार्गदर्शकाची!

व्यक्तिमत्त्व विकास व व्यावसायिक क्षेत्रातील विख्यात प्रशिक्षक आणि 'बॉर्न टू विन'चे संस्थापक व संचालक अतुल राजोळी यांनी अत्यंत सहजसोप्या, हलक्याफुलक्या व मैत्रीपूर्ण शैलीत यशोप्राप्तीचे ५० कानमंत्र या पुस्तकात दिले आहेत. या पुस्तकातलं कोणतंही पान उघडून वाचायला घेतल्यास त्यातून सकारात्मक विचार मिळतो. त्यामुळे हे कानमंत्र आपल्या आयुष्यात प्रभावी बदल घडवण्यासाठी, आपली वैयक्तिक आणि व्यावसायिक स्वप्नं साध्य करण्यासाठी नक्कीच मार्गदर्शक ठरतील.

यशोप्राप्तीच्या मार्गात प्रत्येक क्षणी साथ व प्रेरणा देणारा आणि तुमच्या सुप्त महत्त्वाकांक्षांना प्रत्यक्षात आणण्यासाठी उद्युक्त करणारा – माझा मोटिव्हेटर मित्र!

**पृष्ठ १८०, मूल्य १५० रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत १२० रु.**

**कोवळ्या आई–बाबांसाठी!**

झटपट शिक्षण...झटपट नोकरी...झटपट लग्न...आणि झटपट पोरं–बाळं! थांबा... सर्वच झटपटच्या या जमान्यात मूल होऊ देण्याचा निर्णय मात्र असा झटपट नाही हं घेतला जात. आजची तरुण पिढी विचारपूर्वक आणि सजगपणे पालकत्वाचा निर्णय घेताना दिसते. मात्र माहिती आणि तंत्रज्ञानाच्या या युगात माहितीचं ज्ञान कितीही पालथं घातलं तरी अनुभव तर पहिलाच असतो ना? म्हणूनच आजच्या कोवळ्या आणि नवख्या आई–बाबांसाठी डॉ. लिली जोशी यांचं हे पुस्तक म्हणजे हसत खेळत मार्गदर्शन करणारा आणि पालकत्वाच्या जबाबदारीची ओढ निर्माण करणारा एक आनंददायी अनुभवच आहे.

आजकालच्या प्रेग्नन्सीचे वेगवेगळे फंडे, प्रसूतीचे विविध प्रकार, आईच्या दुधाचं महत्त्व, बाळाची झोप–अंघोळ, त्याचे कपडे, त्याचा आहार, त्याचे ताई–दादा, बाळाच्या संगोपनामधला बाबांचा सहभाग, बाळाचं पाळणाघर, दत्तक घेतलेल्या मुलाचं संगोपन...अशा बाळाशी निगडित सर्व कळीच्या मुद्द्यांवर लेखिकेने सहज सुंदर मार्गदर्शन केलं आहे. या पुस्तकात पारंपरिक चाली–रीती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांची सुंदर सांगड घातलेली आपल्याला दिसेल.

... नवरा–बायकोच्या नात्यातून आई–बाबांच्या भूमिकेत पदार्पण करणाऱ्या सर्व कोवळ्या आई–बाबांसाठी!

**पृष्ठ १४४, मूल्य १२५ रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत १०० रु.**

मैत्रेय प्रकाशन

# ग्रंथपान

## 'नूरजहान'चं संग्राह्य चरित्र

मादक सौंदर्याचा ॲटमबाँब म्हणता येईल अशी गायिका-अभिनेत्री नूरजहान फाळणीनंतर पाकिस्तानात निघून गेली आणि करोडो सिनेरसिक, संगीतप्रेमी हळहळले. जिवंत असतानाच दंतकथा बनून गेलेल्या नूरजहानविषयी फारसे अधिकृत तपशील एकत्रितपणे मात्र मिळत नव्हते. ती उणीव मैत्रेय प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'मलिका-ए-तरन्नुम' या अतिशय देखण्या पुस्तकाने बऱ्याच प्रमाणात दूर केली आहे.

पाकिस्तानात जन्मलेल्या नूरजहानचं बालपण, गरिबी दूर करण्यासाठी सिनेक्षेत्रात पदार्पण केल्यानंतरची पहिली काही वर्षं, या क्षेत्राचे तिने फार झपाट्याने शिकलेले नियम, तिची लोकप्रियता, तिची प्रेमप्रकरणं, १९४७ नंतर पाकिस्तानात स्थलांतरित होण्याचा तिचा निर्णय, तिथे तिने शून्यातून सुरुवात करून पुन्हा मिळविलेली लोकप्रियता, तिचे सांसारिक जीवन, मुलं-परिवार, तिच्या पहिल्या पतीने घटस्फोटानंतर उलगडलेलं तिचं धक्कादायक रूप या साऱ्याची अत्यंत वाचनीय अशी माहिती या पुस्तकात एकत्रित स्वरूपात वाचायला मिळते ही या पुस्तकाची अत्यंत जमेची बाजू आहे.




ऐजाझ गुल या पाकिस्तानी पत्रकाराने हे पुस्तक लिहीलं असून सविता दामले यांनी त्याचा अनुवाद केला आहे.

ऐजाझ गुल आपल्या प्रास्ताविकात म्हणतात, 'पाकिस्तानी चित्रपट उद्योगातील गेल्या साठ वर्षांतील अजरामर दागिना जर कुठला असेल तर तो नूरजहानच आहे यात शंका नाही. पण ती जशी सुप्रसिद्ध होती तशीच कुप्रसिद्धही होती. श्रीमंत असली तरी लोभीही होती. दिलदार असली तरी कठोरही होती. प्रेमप्रकरणं करण्यातलं तिचं रेकॉर्ड तर फारच उन्मुक्त होतं. तिनं केलेल्या दोन्ही लग्नांची परिणती अत्यंत वादग्रस्त घटस्फोटांत झाली. ती उत्तम अभिनेत्री नव्हती. पण आवाजाची तिला दैवजात देणगी होती. माझ्या दृष्टीने तिच्यावर पुस्तक लिहिणं जेवढं कठीण होतं तेवढंच रोमहर्षकही होतं...'

हे आव्हान त्यांनी समर्थपणे पेललं असल्याचं पुस्तक वाचल्यावर लक्षात येतं. पुस्तकातली आकर्षक छायाचित्रं, तिच्या सिनेप्रवासाच्या नोंदी यामुळे तर या पुस्तकाच्या संग्राह्य मूल्यात अधिकच वाढ झाली आहे.

सविता दामले यांनी मूळ पुस्तकाचा तितकाच रसाळ अनुवाद केल्याने त्याही अभिनंदनास पात्र आहेत.

मलिका-ए-तरन्नुम नूरजहान
मूळ लेखक - ऐजाझ गुल
अनुवाद - सविता दामले
मैत्रेय प्रकाशन
पृष्ठे - १५२, मूल्य - रु. १७५

**'ग्रंथाली' येथे सवलतीत १४० रु.**

**विशाल कांबळे**

## नव्या, देखण्या रुपातली 'सुवासिनी'

आपल्या सोज्वळ-सुंदर रुपामुळे, जिवंत अभिनयामुळे घराघरात पोहोचलेली अभिनेत्री म्हणजे सीमा देव. मराठीइतकीच किंबहुना मराठीपेक्षाही जास्त हिंदी चित्रपट केलेल्या, राष्ट्रपती पुरस्कार मिळवलेल्या सीमाताईंचं साधं, सरळ, प्रांजळ आत्मकथन म्हणजे 'सुवासिनी'.

ते प्रथमतः बाजारात आलं ते १९९८ मध्ये. त्याला रसिकांचा उदंड प्रतिसादही लाभला. पण एक तर आता त्याची एकही प्रत बाजारात उपलब्ध नाही; आणि दुसरं म्हणजे १९९८ ते २०१५ या काळात सीमाताईंच्या आयुष्यातही बरंच काही घडलंय.

मग चित्रपट संन्यास बाजुला ठेवून मुलासाठी केलेला 'जेता'सारखा चित्रपट असो, बहरलेली कुटुंबवेल असो, लग्नाच्या ५० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने मुलं-सुनांनी घडवून आणलेला त्यांचा पुनर्विवाह असो, वा त्यांनी जोपासलेले पेंटिंग व संगीत हे छंद असो... सीमाताईंना पुन्हा एकदा रसिकांशी संवाद साधावासा वाटला आणि त्यातूनच आता 'सुवासिनी'ची सुधारित आवृत्ती आकाराला आलीय. मैत्रेय प्रकाशनाने अतिशय देखण्या स्वरूपात ती प्रकाशित केलीय.




सीमाताईंनी या सुधारित आवृत्तीत जी भर घातली आहे ती विशेष लक्षणीय आहे. त्यांना हिंदी-मराठी चित्रपटसृष्टीत आलेले अनुभव, त्यांना भेटलेली त्यांच्यावर प्रभाव टाकणारी व्यक्तिमत्त्वं, प्रसंग, त्यांचं कौटुंबिक जीवन, करिअरमधल्या काही मनोज्ञ आठवणी, काही अविस्मरणीय भूमिकांच्या चित्रीकरणाच्या वेळच्या आठवणी, त्यांनी विधीवत घेतलेलं संगीत शिक्षण, चित्रकलेचं शिक्षण, त्यांची अप्रतिम पेंटिंग्स हे सगळं या सुधारित आवृत्तीत वाचायला-पाहायला मिळतं.

उत्कृष्ट संपादन व छायाचित्रं यामुळेही पुस्तक संग्राह्य झालं आहे. सारी हयात या झगमगत्या दुनियेत काढूनही निगर्वी, प्रांजळ राहिलेली अशी ही कलावती आहे. याच त्यांच्या स्वभावाचं दर्शन या पुस्तकातूनही घडतं. त्यामुळेच पुस्तक मनाला भिडतं.

सुवासिनी
लेखिका - सीमा देव
मैत्रेय प्रकाशन
पृष्ठे- २००+८, मूल्य- रु. २२५

**'ग्रंथाली' येथे सवलतीत १८० रु.**

**संजय पवार**

# लोकवाङ्मय प्रकाशन ग्रंथपान

**भारतीय राजकारण मर्म आणि धर्म**

**प्रा. राम बापट**

**संपादक : अशोक चौसाळकर**




राज्यशास्त्राचे ख्यातकीर्त अभ्यासक आणि सक्रिय विचारवंत प्रा. राम बापट यांचे संकलित साहित्य प्रसिद्ध करण्याचा प्रकल्प लोकवाङ्मय गृहाने हाती घेतला आहे. या प्रकल्पातील तिसरा खंड– 'भारतीय राजकारण– मर्म आणि वर्म' प्रसिद्ध झाला आहे.

प्रस्तुत खंडात प्रा. बापट यांनी आंतरराष्ट्रीय राजकारण व भारतीय राजकारण या विषयांवर जे लेख लिहिले त्या लेखांचा समावेश केला आहे. प्रा. बापटांच्या दीर्घ अशा शैक्षणिक कारकिर्दीत ज्यावेळी समाजापुढे महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले त्यावेळी त्यांनी त्या काळास समोर ठेवून काही लेख लिहिले. हे लेख तत्कालीन वैचारिक पर्यावरणाच्या संदर्भात लिहिले आहेत व त्यात बापटांचे मूलगामी चिंतनही दिसून येते.

या लेखसंग्रहात एकूण तेरा लेख व दोन टिपा आहेत. या लेखांची विभागणी तीन भागांत करता येईल. पहिल्या भागात भारताचे परराष्ट्रधोरण, माओ त्से तुंग यांचे कार्य व १९८९ मध्ये चीनमध्ये झालेला विद्यार्थ्यांचा उठाव या संबंधातील तीन लेखांचा समावेश करण्यात आलेला आहे. दुसऱ्या भागात भारतातील लोकशाही समाजवादी पक्ष, १९७७ सालचा जनता पक्षाचा विजय व १९८३–८४ साली जनता दलाच्या राजकारणाची फेरमांडणी याबाबत बापटांनी आपले विचार मांडले आहेत. प्रादेशिक पक्षांबाबत त्यांनी लिहिलेल्या एका टिपणाचाही त्यात समावेश केला आहे. पुस्तकाच्या तिसऱ्या भागात १९७७ सालानंतरचा संघपरिवार, १९९२च्या बाबरी मशिदीच्या विध्वंसानंतरचे हिंदुत्ववादी राजकारण व भारतीय राष्ट्रीयत्वाचा घाट व हिंदू धर्माचे मर्म व वर्म जाणून घेण्याचा प्रयत्न करणारे एक टिपण यांचा समावेश केला आहे. विषय भारतीय राजकारणासंबंधी असले तरी त्यांत विविधता आहे, गुंतागुंत आहे. १९६८ पासून या विषयावर प्रा. बापट यांनी जे लिखाण केले त्यातील काही निवडक लेख येथे समाविष्ट केले आहेत.

प्रा. राम बापट यांच्या वैचारिक प्रवासाचा आलेख या विविध लेखांतून आपल्यासमोर उभा राहतो. भारताचे संरक्षण व परराष्ट्र धोरण समजावून सांगत असताना बापटांची भूमिका सरळसोट राष्ट्रवादी आहे. पण नंतरच्या काळात जास्त सखोल, अधिक व्यामिश्र व डावीकडे झुकणारी बनते. १९७५ नंतर त्यांच्या विचारांवर मार्क्सवादाचा खोल असा प्रभाव पडलेला दिसतो. त्यामध्ये मार्क्सचे सुरुवातीचे लिखाण इटालियन मार्क्सवादी विचारवंत ग्रामसी व फ्रेंच आणि जर्मन नवमार्क्सवादी विचारांचा प्रभाव आहे. पण लेनिनवादाबाबत मात्र ते फारसे उत्साही दिसत नाहीत. १९७७ नंतरच्या लिखाणात हा प्रभाव आपणास जाणवतो. जनता पक्षाच्या विजयाची वर्गीय मीमांसा महाराष्ट्राच्या संदर्भात त्यांनी केली आहे. त्याचबरोबर म. गांधी व म. फुले यांचा विचार त्यांना प्रभावित करताना दिसतो. म. फुले यांच्या विचारांच्या अनुरोधाने परिवर्तनाच्या पाठीमागे असणाऱ्या सांस्कृतिक परिमाणांच्या प्रभावाचा आग्रह बापटांनी धरला व व केवळ वर्गीय अंतर्विरोध प्रगतीची प्रेरक तत्त्वे असतात हा सिद्धांत नाकारला. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांनी सत्यशोधक समाजाच्या ब्राह्मणांचे धुरीणत्व नष्ट करणाऱ्या कार्यक्रमांचे यशस्वी व्यवस्थापन केल्याबद्दल त्यांना यशवंतराव चव्हाणांबद्दल वाटणारा आदर व्यक्त झालेला दिसतो. तसेच महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या चळवळीला प्रागतिक विचारांचे दलित तरुण आणि मराठा जातीतील शेतकरी समूहातील तरुणच पुढे नेऊ शकतील व सध्याची वरिष्ठ जातवर्गीय अभिजनांच्या वर्चस्वाची कोंडी फोडू शकतील ही भूमिका समोर येते.

इ.स. २००० नंतर प्रा. बापट धर्माच्या संबंधात जास्त व्यापक व समंजस भूमिका घेताना दिसतात. त्या संदर्भातील त्यांनी म. फुले, रानडे, म. वि. रा. शिंदे, डॉ. आंबेडकर व म. गांधी यांच्या धर्मविचारांचा खोल असा अभ्यास केला. त्यातून त्यांना बौद्ध धर्मविचारांविषयी आकर्षण निर्माण झाले होते. त्याचाही ते अभ्यास करीत होते. धर्मविषयक जाणीव मानवी जीवनाची संपदा व गुणवत्ता उन्नत राहण्यासाठी व मानवाचे सामाजिक व वैयक्तिक जीवन नीतिगर्भ ठेवण्यासाठी आवश्यक आहे असा विचार या खंडातील धर्मविषयक लिखाणात प्रकर्षाने आढळून येतो.

परिवर्तनवादी प्रवाहातील बहुविध धारांशी वैचारिक वाद–संवादातून एकंदर विचारविश्व प्रगल्भ करण्यात मोलाची भर घालण्याऱ्या या लेखनाचे साक्षेपी वाचकांकडून स्वागत होईल अशी उमेद वाटते.

**पृष्ठ २७२, मूल्य ३२५ रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत २६० रु.**

## ग्रंथाली




### आंदकोळ – किसन चव्हाण


सांगून थांबत नाही तर व्यवस्थेशी लढायला शिकवतो आणि म्हणूनच हे आत्मकथन फक्त लेखकापुरते मर्यादित रहात नाही तर व्यवस्थेनं वर्षानुवर्षे दाबलेल्या, पिचलेल्या बहुसंख्य शोषितांचं व उपेक्षितांचं होतं. जीवन जगावं कसं? रडत-रडत, कुढत-कुढत की लढत-लढत असं जीवन जगण्याचं तत्वज्ञान मांडणारं हे आत्मकथन रडगाणं ठरत नसून जीवनगाणं ठरतं.

किसन चव्हाण याचं हे आत्मकथन संक्रमित व कालक्रमिक असून भारदस्त व प्रसंगनिष्ठ आहे त्यासाठी वापरलेली सत्यनिष्ठ, वाचकप्रिय आणि परिवर्तनवादी भाषा समिक्षकांनाही अंतर्मुख करणारी ठरेल. तथागत गौतमबुद्ध, संत कबीर, महात्मा फुले, छत्रपती शाहु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदि महापुरूषांना अभिप्रेत असणाऱ्या पुरोगामी विचारालाही हे आत्मकथन निश्चितच प्रेरक ठरेल यात शंका नाही.

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

### १४ महिने १३ दिवस – ज्ञानेश्वर भोसले

**शब्दांकन : अरुण रामतीर्थकर**




केवळ पारधीच नव्हे तर, विभिन्न भटक्या जमातीच्या बांधवांना अनिकेत, असहाय आणि अकिंचन अवहेलनेच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठीची लढाई ज्ञानेश्वर भोसले 'निग्रही मानसिकतेच्या बळावर लढतो आहे. अपूर्वचंद्रा आणि डॉ. जगदीश पाटील यांसारखे कर्तव्यपरायण जिल्हाधिकारी ठामपणे पाठीशी उभे राहतात तेव्हा त्याच्यातील कार्यकर्ता मोहरून-बहरून जातो. कपाळावर ठोकलेली गुन्हेगारीची आणि अस्तित्वहीनतेची तप्तमुद्रा भिरकावून द्यायच्या प्रक्रियेला सशक्त सुरुवात झालीय...'

**– अरुण करमरकर**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

### शिल्पा खेर लिखित तीन पुस्तकांचे प्रकाशन २८ ऑक्टोबर २०१५

**जस्ट बिलिव्ह!     सोल्जर इन मी भाग १     ऐ मेरे वतन के लोगो...**




प्रकाशन हस्ते
**अविनाश धर्माधिकारी, विजया वाड, कॅप्टन सुरेश वंजारी**

**गडकरी रंगायतन, ठाणे (प.)**
**सायंकाळी ५ वा.**

**★ सर्वांना आग्रहाचे निमंत्रण ★**



# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## निवडणूकविषयक कायदे आणि प्रक्रिया

दिलीप शिंदे




'लोकांचे लोकांनी लोकांसाठी निवडून दिलेले...' ही आपण चांगलीच पाठ केलेली व्याख्या. लोकशाही म्हटली की निवडणूक आलीच. त्यातून आपली लोकशाही ही जगात सगळ्यात मोठी. त्यामुळे लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद असो की ग्रामपंचायत; निवडणूक–प्रक्रिया आलीच. मग ती उमेदवारांची प्रचाराची धावपळ, निवडून येण्यासाठी करावी लागणारी धडपड आपण पाहतो. रांगेत उभे राहून निवडणुकीच्या मांडवाखाली जाऊन मतदान करतो. एक सामान्य नागरिक म्हणून पार पाडायचे पवित्र कर्तव्य ही आपली यापाठची भावना. परंतु हे कर्तव्य पार पाडण्यापूर्वी या प्रक्रियेत असलेल्या अनेक घटकांविषयी आपण जागरूक असतोच असे नाही. निवडणूक–प्रक्रिया पार पाडण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना खास प्रशिक्षण दिले जाते. त्याप्रमाणे ते सर्व प्रक्रिया चोखपणे पार पाडतात. नागरिक म्हणून आपल्याला काहीच करायचे नसते. मतदानकेंद्रावर जाऊन मतदानपत्रिकेवर शिक्का मारायचा. आता मशीनचे बटण दाबायचे. बस्स! खरी गंमत आहे ती इथेच. संपूर्ण मतदानप्रक्रियेशी नागरिकांची नाळ कुठेच जोडलेली दिसत नाही. ना कुणी त्यासाठी प्रशिक्षण घेताना दिसतात. कुठेतरी वर्तमानपत्रातून काही वाचनात आले तर तेच आपले प्रबोधन. नावालाच अधिकार आणि नावाचेच कर्तव्य. घडीभराची नवलाई!

नागरिक, सुजाण नागरिक, जागरूक नागरिक म्हणून ही संपूर्ण मतदानप्रक्रिया आपल्याला ठाऊक असायला हवी. तिचे कायदे तर माहीत असायलाच हवेत. हे नागरिक म्हणून पहिले कर्तव्य आहे. तरच या प्रक्रियेला डोळसपणाचे स्वरूप येऊ शकते. त्यासाठी कुणाकडे मदत मागायची वा कुठे हेलपाटे मारण्याची गरज नाही. कायदे आणि प्रक्रिया समजावून सांगणारे पुस्तकच आता आपल्या हाती आले आहे. त्याचे नाव आहे, 'निवडणूकविषयक कायदे आणि प्रक्रिया'. त्याचे लेखक आहेत, दिलीप शिंदे, जे स्वतः याच प्रक्रियेत गेली अनेक वर्षे सक्रिय आहेत.

मतदार, मतदार याद्या, ओळखपत्र, मतदानकेंद्र, मतदान कर्मचारी, मतदानाची पद्धत, मतदानकेंद्राचा परिसर, निवडणुकीला उभा राहू इच्छिणाऱ्या उमेदवाराची पात्रता आणि अपात्रता. त्याचा उमेदवारी अर्ज, उमेदवाराने पाळायचे नियम आणि त्यातून होणारे गुन्हे. निवडणुकीच्या दरम्यान लागू करण्यात येणारी आचारसंहिता आणि तिचे स्वरूप. प्रचाराचा भाग म्हणून करण्यात येणारे वसाहतीचे विद्रुपीकरण, मतदानाच्या दिवशी हजर राहणे शक्य नसेल तर टपाली मतदान, निवडणूक आयोग; असे अनेक विषय आहेत, ज्यांची माहिती प्रत्येक नागरिकाला माहीत असणे आवश्यक आहे. त्यातच आता भर पडली आहे ती नवीन मतदान मशीनची. त्याच्या कार्यपद्धतीबद्दल आपण अनभिज्ञ आहोत. पण या पुस्तकात त्याची संपूर्ण माहिती दिलेली आहे. हल्लीच एका राजकीय नेत्याच्या निमित्ताने 'पेड न्यूज' नावाचा खटला न्यालयात सुरू आहे. त्या विषयीचा कायदा, आणि लोकप्रतिनिधी कायदा, यांची माहिती लेखकाने या पुस्तकात दिलेली आहे. त्यांचा उपयोग केवळ मतदारालाच नव्हे तर उमेदवारालाही चांगल्या प्रकारे होऊ शकतो. नव्हे उत्तम उमेदवार कसा असावा याचे भान उमेदवारालाच येऊ शकेल.

सुजाण आणि जागरूक मतदार, योग्य उमेदवार आणि उत्तम मतदानप्रक्रिया यांचा योग्य समन्वय राखण्यासाठी 'हँडबुक' म्हणून या पुस्तकाचा नक्कीच चांगला उपयोग होऊ शकेल. यातील माहितीबरहुकूम सर्वच प्रक्रिया पार पडली तर त्यातून जे जे उत्तम असेल तेच घडेल.

यातील लेख यापूर्वी वर्तमानपत्रातून लेखमालेच्या स्वरूपात प्रसिद्ध झालेले आहेत. सहजसोपी लेखनपद्धती वापरल्यामुळे विषय बोजड असूनही वाचनीय झालेला आहे. संसदभवन आणि विधानभवन यांच्या प्रतिकृती ठळकपणे दाखवून गोलाकारात मतदान केलेल्या बोटाची निशाणी दाखवली आहे. तीही तिरंगी रंगांचा पार्श्वभागी उपयोग करून. समोरच संसदभवनावर तिरंगा आहे आणि अंगठ्याजवळ विधानभवनावरील राजमुद्रा आहे. रघुवीर कुल यांचे हे मुखपृष्ठ विषयानुरूप उठावदार झाले आहे.

● **मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.**

# ग्रंथपान

**दीपदान**

सुरेश भट यांच्या प्रकाशित गझलांमधल्या काही निवडक शेरांचं संकलन

संकल्पना, निवड, संपादन

**चंद्रशेखर सानेकर**




गझलचा 'शेर', म्हटले तर दोन ओळींची रांग. म्हटले चरण श्लोकासारखे. पण त्याची ताकद? ऐकणाऱ्याच्या मुखातून येते, क्या बात है!

'दीपदान' हे अशाच काही निवडक शेरांचा संग्रह असलेले पुस्तक. हे शेर आहेत सुरेश भट यांच्या गझलसंग्रहातील. 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार', 'झंझावात', 'सप्तरंग', आणि 'रसवंतीचा मुजरा' हे त्यांचे संग्रह. या संग्रहांमधून काही निवडक शेरांची निवड केली आहे चंद्रशेखर सानेकर यानी. सानेकर स्वतः गझलकार आहेत. त्यांच्या नावावरही पाच गझलसंग्रह प्रकाशित आहेत. 'एका उन्हाची कैफियत', 'एका शहराच्या खुंटीवर', 'नभाशी बोलण्यासाठी', 'माझ्या काळाचा अनुवाद', 'एक अजब कोलाहल' ही त्यांची नावे. आजच्या पिढीतल्या एका तरुण गझलकाराने आदर्श असणाऱ्या पिढीतल्या, गझलचा बादशहा समजल्या जाणाऱ्या एका गझलकाराच्या काही शेरांना वाचकांच्या समोर मांडण्याचा प्रयत्न 'दीपदान'मध्ये केला आहे. 'दीपदान' हा शब्द सुरेश भट यांचाच, फुलावयास लागलीस...या गझलेतील. 'एल्गार'मध्ये आहे ही गझल. तिची आठवण सानेकर पहिल्याच पानावर नोंद करतात,

*म्हणू नका आसवांत माझे बुडून केव्हाच स्वप्न गेले*
*उदास पाण्यात सोडलेले प्रसन्न ते दीपदान होते*

सानेकरांनी मुक्तपणे भटांच्या शेरांची निवड केलेली आहे. ती करताना शेरातला एक शब्द निवडला. त्या शब्दाची गुंफण करून जे शेर भटांनी लिहिलेले आहेत ते वेचून काढले. यात येणाऱ्या भावभावना, संवेदना, कल्पना, हेतू वेगवेगळे आहेत. त्यांची शैली, आकृतिबंध, सौंदर्य, लावण्य प्रत्येकागणिक वेगवेगळे आहे. एकाच नावाच्या माणसांचा एक समूह करावा तसे. तरीही प्रत्येकाचे रूप वेगळे दिसते, तशी एकाच शब्दाची अनेक रूपे अनुभवास येतात. भटांचा अख्खा संग्रह वाचून मिळणारा आनंद, आणि एकाच विषयास अनुसरून एकत्रित आलेल्या शेरांमुळे होणारा आंनद हा सारखाच असू शकणार नाही. परंतु कल्पनेचा आणि प्रतिभेचा विलास याची वेगळीच अनुभूती येथे प्रत्ययास येते, हे नाकारता येत नाही. चित्रप्रदर्शनात असे प्रयोग पाहायला मिळतात. एकाच विषयावर चितारलेली विविध रूपे मोहून टाकणारी असतात, हा आपला अनुभव आहेच. दीपदानातला अनुभव उदाहरणार्थ पाहूया.

सुरेश भटांच्या अनेक शेरांमध्ये आलेला एक शब्द म्हणजे 'ओठ'. त्यातले दोन शेर असे,

*चुंबिलास तू माझा शब्दशब्द एकांती*
*ओठ नेमके माझे टाळलेस का तेव्हा*

दुसरा शेर,

*सकाळी तू उन्हापाशी जरी केलास कांगावा*
*तरीही खूण चंद्राची तुझ्या ओठावरी होती.*

अशी विविध भावभावनांची रूपे दाखवणारे तेरा शेर सानेकरांनी निवडलेले आहेत.

'शब्द'–

तू मला अर्थ दे अजून तरी
शब्द ओलांडले तुझ्यासाठी

आणि

*दिले माझ्याच दुःखाने तुझे लावण्य शब्दांना*
*फुलांवाचून मी साऱ्या फुलांचे बांधले झेले*

'शब्द' या शब्दाचे अठरा शेर आहेत.

'आयुष्य'–

*टाळले त्याला, तरीही गाठले त्याने मला*
*वागले आयुष्य माझे सावकारासारखे*

'आयुष्य' या शब्दाचे आठ शेर निवडलेले आहेत.

स्वप्ने, चांदणे, आकाश, फुले, सुगंध, तारुण्य... असे अनेक शब्द आहेत, ज्यांच्याभोवती सुरेश भट विविध अंगांनी भिडलेले आहेत. त्यांच्या अनेक छटा एकत्रितपणे या संग्रहात अनुभवास येतात, कॅलिडोस्कोपप्रमाणे.

सानेकरांनी प्रत्येक विषय सुरू करताना आरंभी एक काव्यांश दिलेला आहे आणि त्यात योजित शब्द चपखलपणे योजलेला आहे. शीर्षक शब्दकाव्य अशा अर्थाने. तो चटकन ओळखता यावा म्हणून मुद्दामच त्याला इतरांपेक्षा थोडा गडद अन् ठळक केलेला आहे. शेर कुठल्या संग्रहातून घेतला आहे, त्याचे नाव त्या शेरापुढे दिले आहे. ही निवड करताना भटांचे संग्रह ज्या क्रमाने प्रकाशित झाले त्या क्रमाने शेर आलेले आहेत. मांडणी करताना काही पानांवर तीन शेर आहेत, काहींवर आठ.

भटाच्या काव्यसंग्रहांचा सानेकरांनी घेतलेला धांडोळा हा केवळ शेर वेचण्यापुरता मर्यादित नाही. प्रत्येक संग्रहाचा ते साकल्याने वेध घेताना दिसतात. संग्रह प्रकाशित होण्याचा क्रम, प्रत्येकात आलेली सूक्ष्म संवेदना, अंतर्मुख जाणीव, भावनांची अभिव्यक्ती, चिंतन–मनन, गती, व त्यात कालानुक्रमे होत गेलेले बदल यांचाही पोत ते उलगडून पाहतात. भटांच्या गझलेची प्रकृती ही त्यांच्या स्वभावाशी साम्य राखणारी आहे. 'भट स्वतः उत्कट, सडेतोड आणि रोखठोक होते. तसा त्यांच्या काव्याचा पोत तीव्र आवेगी, उत्कट, सडेतोड आणि रोखठोक दिसतो', असे ते नमूद करतात. भट लोकानुनयी नाही लोकाभिमुख कवी होते. ते जीवनवादी कवी होते. भटांचे शेर कसे आहेत, याविषयी सानेकर उत्कटतेने भावना व्यक्त करतात.

गझल आणि शेर याबाबत सुरेश भट यांची काय मते होती, हेही समजून घेण्यासारखे आहे. भट, एल्गारच्या कैफियतीत म्हणतात, ' गझल म्हणजे एक तत्त्वज्ञानच आहे. आणि ती एक जीवनशैलीही आहे. जेव्हा आपण जीवनाच्या विविध चवी घेत असतो तेव्हा आपण गझलच जगत असतो. एकेक शेर म्हणजे जगण्याची चव, एकेक प्रत्यय'. तर 'रंग माझा वेगळा' मध्ये सांगतात,'शेरात जे सांगायचं आहे ते त्याची प्रस्तावना ही पहिली ओळ असते; तर दुसरी ओळ म्हणजे पहिल्या ओळीतील प्रस्तावनेचा प्रभावी समारोप असतो'.

भटांची प्रकृती आणि शैली, त्यांची प्रतिभा या सगळ्याचा वेध सानेकरांनी घेतला आहे. त्यासाठी त्यांनी दीर्घ प्रस्तावना दिलेली आहे. ही प्रस्तावना या शेरांइतकीच दमदार आणि समर्पक झालेली आहे. 'दीपदान' या शीर्षकास अनुसरून सतीश भावसार यांनी साकारलेले मुखपृष्ठ आशयसंपन्न तर आहे.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

डॉ. रामाणी यांची पुस्तकांची मालिका पाहिली तर, ती उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली ठरावीत, अशीच आहे. त्याच मालिकेतील नवे पुस्तक, 'चाला, पळा, धावा.'

आरोग्य उत्तम राखण्यासाठी डॉक्टरकडेच उपाय आहेत, या समजाला छेद असा, की डॉक्टरी उपाय हे ३० टक्के तर स्वतः अंगिकारलेले उपाय ७० टक्के आहेत. ते प्रत्येकाच्या हातात आहेत. त्यापैकी एक आहे, 'चाला, पळा आणि धावा.'

या पुस्तकाच्या तपशिलाकडे वळण्यापूर्वी काही वाक्ये पाहू. जी उपदेश नाही, आपला आपल्याशीच सल्ला दिल्यासारखी भासतील. पण हे लक्षात असावे की, ही वाक्ये अनुभवातून आलेली आहेत.

**चाला, धावा, पळा...**
डॉ. पी.एस. रामाणी




'केवळ निश्चयी व्यक्तीच कोणत्याही गोंधळाच्या प्रसंगी ठाम निर्णय घेऊन तो अमलात आणू शकते.'

'सुदृढ शरीर आणि उत्कृष्ट मानसिक ताकद या दोन्ही गोष्टींचे मिश्रण असणाऱ्या व्यक्ती आयुष्यात फार लांबचा पल्ला गाठू शकतात. आणि अशा प्रकारचे मिश्रण जॉगिंगमुळे साध्य करता येऊ शकते.'

'जॉगिंग ही एक अशी क्रिया आहे, की जिचा तुम्ही तुमच्या संपूर्ण कुटुंबासमवेत आनंद घेऊ शकता. जे कुटुंब एकत्र धावते ते नेहमी एकत्र राहते.'

'धावण्याकडे केवळ छंद म्हणून न पाहता त्याबद्दल तळमळ ठेवा. त्यामुळे अंगी शिस्त आणि समर्पणवृत्ती बाणवणे सोपे जाईल.'

पुस्तकाच्या शीर्षकावरून लक्षात यावे की, ते आपल्या नेहमीच्या परिचयाच्या व्यायामाबाबत काही तपशील घेऊन आपल्याशी हितगुज करायला आलेले आहे. आपली शारीरिक, मानसिक स्थिती उत्तम राखण्याचा सोपा मंत्र घेऊन आले आहे. त्यासाठी काय करायला हवे? १. जॉगिंगसाठी सकाळी लवकर उठायला हवे. याची सवय करायला हवी. जॉगिंगचे लक्ष्य निश्चित करायचे. २. कुठल्याही परिस्थितीत आठवड्यातून किमान चार वेळा तरी जॉगिंगचा नियमित सराव ठेवावा. ३. व्यायामाची जागा निवडण्यावर कोणत्याही मर्यादा नाहीत.जेवणानंतरची १५ मिनिटे सोडली तर केव्हाही धावण्याचा सराव करण्यास सज्ज होऊ शकता. ४.नियमित सराव व चिकाटी या नियमांचे पालन करणे महत्त्वाचे असते.५. ग्रुपमध्ये जॉगिंग करण्यात एक वेगळीच मजा असते. त्यामुळे शक्य होईल तेव्हा आपल्या मित्रमैत्रिणींनासुद्धा जॉगिंगकरिता उद्युक्त करावे. व त्यांच्यासह जॉगिंगचा आनंद घ्यावा. ६. सरावापूर्वी व नंतर ५ मिनिटे नियमितपणे केलेले स्ट्रेचिंग शरीराचा लवचीकपणा राखून ठेवेल. त्यासाठी आठवड्यातील ३० मिनिटांची किमान दोन सत्रे वेगळी राखून ठेवणे आवश्यक आहे. किती सोप्पे!

एखादी गोष्ट शिकायची, हौस म्हणून करायची, तरी तिचे प्रकार, नियम, पद्धती माहीत असणे आवश्यक असते. त्यातले काही प्रकार इथे दिलेले आहेत. जे नियमितपणे सराव करतात त्यांना ते माहीत असेलही. तरी पूर्ण तपशील माहीत झाला तर तो फायदेशीर ठरू शकतो. पाहूया ते प्रकार : फ्लेक्सिबिलिटी ट्रेनिंग, कोअर स्टॅबिलिटी ट्रेनिंग, स्ट्रेंग्थ ट्रेनिंग, क्रॉस ट्रेनिंग, म्हणजे काय, याचे प्रकार कोणते आणि ते करण्याची कृती दाखवणारे फोटो दिलेले आहेत. त्यांचे प्रमाण, फायदे दिलेले आहेत. जॉगिंगचे वेळापत्रक, जॉगिंग शूजची निवड, जॉगिंग आणि पल्स रेट, लाँग रन आणि क्वालिटी रन, अधिक वेगाने धावण्याकरता टिप्स, चढाव किंवा टेकडीवरील प्रशिक्षण, जॉगिंगमधील शिस्त आणि योग्य प्रमाणातील सराव, जॉगिंगसाठी मार्गदर्शक तत्त्वे, मॅरेथॉनचा दिवस... हे सारे कुणाही धावपटूसाठी उपयुक्त ठरणारे आहे. त्यात 'मॅरेथॉन धावकाकरता जल आणि आहार योजना' हे प्रकरण आवर्जून ध्यानात ठेवावे असे आहे.

डॉ. रामाणी स्वतःचा अनुभव इथे नमूद करत आहेत. किंबहुना हे पुस्तक त्यावरच आधारलेले आहे. परंतु जोडीला आणखी काही अनुभवी व्यक्तींचे अनुभव दिलेले आहेत. ते आहेत सुनील शेट्टी व संगीता शेट्टी. यांनी त्यांचा अनुभव त्यांच्याच शब्दात दिलेला आहे. २४ तासात अनुक्रमे १३८ व १२० किमी चालण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. डॉ. आनंद पाटील, परेश संघवी, किशन कुमार, डॉ. पाब्लो इरॅट, इंदिरा बेकरीकर, डॉ. दीपक उग्रा पिडियाट्रिक फिजिशियन. यांचे अनुभव कुणालाही नक्कीच प्रेरक ठरतील.

एकूणच हे पुस्तक म्हणजे जॉगिंग करणाऱ्यांसाठीच नव्हे तर आपल्या आरोग्याची काळजी घेऊ इच्छिणाऱ्या सगळ्यांसाठी उपयुक्त ठरू शकेल.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

'शिल्पकार फक्त प्रतिकृती करणारा कलाकार नाही. प्रत्येक कलाकार त्याचं स्वतःचं नवं काहीतरी प्रतिकृती करतानाही देतच असतो.'

'स्थापत्यकार हा उत्तम शिल्पकार असला पाहिजे. तो जर शिल्पकार नसेल तर तो फक्त रिकाम्या निर्जीव भिंती उभ्या करू शकतो. तो शिल्पकार असेल तर तो उत्तम सजीव वास्तुशिल्पाची निर्मिती करू शकतो.'

मायकेलअँजेलो हा शिल्पकार होता, चित्रकार होता, कवी होता. ही वरवरची माहिती त्याने निर्माण केलेल्या कलाकृती पाहिल्यानंतर लक्षात आली होती. परंतु ही ओळख फार जुजबी आणि तात्पुरत्या स्वरूपाची होती. त्याच्या या कलाकृती पाहिल्यानंतर त्याच्याविषयीचे कुतूहलही मनात होते. त्याला पूर्णविराम मिळाला तो हे पुस्तक हाती आले तेव्हा.

यात मायकेलअँजेलो कोण होता, कसा घडत गेला, हे ओघाने येतेच. प्रत्येक कलाकृती कशी निर्माण केली, त्याचा इतिहास आणि तपशील त्यामुळे कळत गेला. परंतु थबकण्याची वेळ येते ती शिल्पकार शिल्प घडवताना कसा विचार करतो?


एक मनोरंजक उदाहरण या संदर्भात पाहण्यासारखे आहे. डेव्हिड-गोलायथच्या युद्धाचा प्रसंग. यावर अनेक शिल्पे आणि चित्राकृती यापूर्वी निर्माण झालेल्या होत्या. परंतु हे काम त्याने स्वीकारले आणि ते कसे पूर्ण केले, याचे हे उदाहरण.

'डेव्हिड हा मेंढपाळाचा मुलगा. सॉल राजाला आणि त्याच्या राज्याला त्रास देणारा गोलायथ नावाचा महाकाय राक्षस. त्याच्याशी लढण्याचे आव्हान डेव्हिड स्वीकारतो. आणि त्यावेळच्या शस्त्राप्रमाणे गोफणीने दगड मारून तो गोलायथला ठार करतो व त्याचे मुंडके राजाला नेऊन देतो.' या प्रसंगाची उभारणी करायची आहे. ती करताना तो विचार करतो, डेव्हिडमध्ये काय आहे? त्याचे वयानुसार कोवळेपण आणि पौरुष. तो कुणाचे प्रतीक आहे? गोलायथला मारण्यापूर्वी त्याच्या मनात कोणते भाव असतील? किंचित भीती, थोडासा तणाव, की द्विधा मनःस्थिती? गोलायथचे मुंडके पायाशी पडलेले दाखवायचे की, फक्त मारताना दाखवायचे? दोघे दाखवायचे की एकटा? पण सर्व प्रसंग उभा करणारा, शेवटी तो एकटाच डेव्हिड दाखण्याचा निर्णय घेतो. परंतु पूर्ण प्रसंगाला न्याय देतो.

शिल्प उभे करण्यापूर्वीची जी मानसिक तयारी लागते, तिचे वर्णन हे शिल्पकाराच्या दूरदृष्टीचे, मोठेपणाचे, अचूकतेचे आणि कल्पकतेचे द्योतक म्हणायला हवे. तीच तऱ्हा शिल्पासाठी उपयोगात आणायच्या संगमरवरी शिळेची. तिला पारखण्याची.

## दैवी प्रतिभेचा कलावंत मायकेलअँजेलो

डॉ. माधवी मेहेंदळे




मायकेलअँजेलो हा कसबी शिल्कार होता. त्याचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते. परंतु त्याचवेळी त्याचा स्वतःवर असलेला दृढविश्वास आणि आपण एक काम किती वेळेत पूर्ण करू शकू आणि ते कसे पूर्ण करू याच्या कल्पना स्पष्ट होत्या. वास्तविक लिओनार्डो द व्हिंची त्याच्यासमोर होता. त्याच्यासारख्या महान कलावंताशी स्पर्धा करणे सोपे नव्हते. तरीही त्याच्याशी स्पर्धा न करता स्वतःच्या कामावर त्याने लक्ष केंद्रीत केले. पोपच्या आग्रहाखातर त्याने सिस्टाईन चॅपेलच्या छतावरचे रंगकामही केले. मेहनत करण्यावर प्रचंड विश्वास असलेला, तरी आपल्याला काय येऊ शकणार नाही याची कबुलीही तो देतो. ज्याची जबाबदारी घेतो, ते पूर्ण करण्यासाठी दिवसाचे २४ तास त्याला २८ हवे असतात. हा कलावंत स्वतःला विसरून काम करतो. ते पाहून थक्क होतो.. विशेष म्हणजे होणारे श्रम आणि आलेले विचार यांना तो वाट करून देतो ते काव्यात.

चरित्रलेखनासाठी आवश्यक असणारी सामुग्री मिळवून ते लिहिणे सोपे म्हणता येईल. परंतु एखाद्या चित्रकार, शिल्पकार असलेल्या कलावंताचे चरित्र लिहायचे तर नुसती सामुग्री उपयोगी नाही. त्याचे विविध पैलू, प्रत्येक कलाकृती मागची मानसिकता, तिच्यातले सौंदर्य, विश्लेषण, काव्य, तत्त्वज्ञान समजून घ्यावे लागते, त्याचा अभ्यास करावा लागतो. हे श्रम पेलण्याचा वकूब असेल तरच त्या चरित्राला न्याय मिळू शकतो. त्या दृष्टीने विचार केला तर, लेखिकेचे कर्तृत्व सिद्ध झाले आहे असे ठामपणे म्हणता येते.

कलावंताने केलेल्या कलाकृतींचे वर्णन अधिक स्पष्ट करण्याची गरज नसते. ती कलाकृती समोर ठेवली की सगळी वर्णने, तपशील फिके पडतात. त्याचा अनुभव यात दिलेल्या फोटोवरून येतो. यासाठी मायकेलअँजेलोने किती आणि कशी मेहनत घेतली, याचा उलगडा होत जातो. परंतु त्याचवेळी या कलाकृतींकडे पाहण्याची आपली दृष्टीही तयार होते. अतिशय सुंदर कलाकृती त्याने निर्माण केलेल्या आहेत. त्यामागची प्रेरणा आणि तपशील वाचल्यानंतर, कलाकृतीचे सौंदर्य कशात आहे याचा उलगडा हात जातो, आणि आपणच त्यात अधिक गुंतत जातो. लेखिकेने घेतलेले परिश्रम आणि लेखनातील सहजता, यामुळे मायकेलअँजेलो जवळचा वाटू लागतो. मायकेलअँजेलोच्या कलाकृतीचे सौंदर्य दर्शवणारे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी तयार केले.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

## ॥ग्रंथाली॥ पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे



दत्ताजी देसाई लिखित 'जीवन अमृत झाले' पुस्तक प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. नीना सावंत, माजी कुलगुरू स्नेहलता देशमुख, लेखक दत्ताजी देसाई, शरद काळे आणि सानिका सावंत



डॉ. नीना सावंत आणि सानिका सावंत लिखित 'Tomorrow's still to come' पुस्तक प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. नीना सावंत, माजी कुलगुरू स्नेहलता देशमुख, सानिका सावंत, दत्ताजी देसाई आणि शरद काळे




हसिक-रसिक या विनोदी कथासंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कथासंग्रहाच्या लेखिका प्रगती कोळगे, प्रा. मिलिंद जोशी, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर, महाराष्ट्र भाषा सल्लागार समितीचे सदस्य अरुण जोशी, ग्रंथसखा वाचनालयाचे श्याम जोशी, उपनगराध्यक्ष श्रीधर पाटील आदी उपस्थित होते.

RNI No. MAHMAR/2013/50137
Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




Follow us on f अनेक चविष्ट पाककृती जाणून घेण्यासाठी लॉग ऑन करा www.everestspices.com वर. Situations/Everest/159/2014 Mar

मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.